महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

मूल्य २/- रुपये

• संपादकः राकेश शंकर गोरे | वर्षः १५, अंकः ४३, पृष्ठः ८ | मुंबई, मंगळवार २१ जानेवारी २०२५ ते सोमवार २७ जानेवारी २०२५ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## महाराष्ट्रात राजकीय भूकंपाचे संकेत! राज्यात नव्या समीकरणाचा 'उदय'



■ मुंबई : विशाल कारंडे

**शिवसेनेत बंड करून एकनाथ शिंदे बाहेर पडल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात अडीच वर्षापूर्वी मोठा राजकीय भूकंप झाला होता. तशाच भूकंपाचे संकेत सध्या मिळत आहेत. त्यामुळं महाराष्ट्राच्या राजकारणात आणखी एक भूकंप आणि नवा 'उदय' होणार का? याकडं संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे.**

महाराष्ट्राच्या राजकारणात येत्या काळात आणखी एका नव्या राजकीय भूकंपाचे संकेत मविआच्या नेत्यांच्या वक्तव्यातून मिळाले आहेत. 'एकनाथ शिंदेंना संपवून उद्या नवा 'उदय' पुढे येईल' असं वक्तव्य काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केलं. उद्धव ठाकरेंना संपवून शिंदेंना आणलं, 'एकनाथ शिंदे, अजित पवारांना दूर करण्याचे प्रयत्न' असं म्हणत वडेट्टीवारांनी भाजपवर गंभीर आरोप केला. भाजपला राज्यात एकहाती सत्ता पाहिजे असं म्हणताना त्यांनी याची सुरुवात 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतून' होणार असल्याचं म्हणत राजकीय वर्तुळाचं लक्ष वेधलं. भाजपच्या याच भूमिकेवर ठाकरेंच्या शिवसेनेतील नेते संजय राऊत यांनीसुद्धा स्पष्ट प्रतिक्रिया देत राज्याच्या राजकारणातील सर्वात मोठा गौप्यस्फोट केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाकुंभ मेळयात जावं असा खोचक टोला त्यांनी लगावत, एकनाथ शिंदेंना बाजूला करून एक नवा 'उदय' समोर येईल असं स्पष्ट वक्तव्य केलं. उदय सामंत यांच्या दावोस दौऱ्यावरही राऊतांनी निशाणा साधला. 'एकनाथ शिंदेंना बाजूला करून एक नवा 'उदय' समोर येईल. माझ्या माहितीप्रमाणे उदय सामंत यांच्यासोबत २० आमदार आहेत. ही माहिती माझी... २० आमदार जेव्हा एकनाथ शिंदे सरकार स्थापन करताना रुसले होते तेव्हाच हा 'उदय' होणार होता किंबहुना तेव्हाच हा 'उदय' करण्याचं निश्चित झालं होतं. पण एकनाथ शिंदे सावध झाले आणि झाकली मूठ सव्वालाखाची... हे महाराष्ट्रातील सगळे पक्ष फोडतील. शिंदे गटही फोडतील, अजित पवार गटही फोडतील. फोडाफोडी हेच त्यांचं जीवन आणि राजकारण आहे', अशा शब्दांत त्यांनी भाजपवर कडाडून टीका केली.

## संक्षिप्त

### कधीही गुन्हेगाराचे वकीलपत्र घेतलेले नाही

■ ठाणे : तृप्ती गोरे

फौजदारी क्षेत्र निवडूनही मी कधीही गुन्हेगाराचे वकीलपत्र घेतलेले नाही, मी नेहमी गुन्हेगारांविरोधात काम केले आहे, असे स्पष्ट मत पद्मश्री सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम यांनी व्यक्त केले. मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे या संस्थेच्यावतीने करिअर कट्ट्याच्या दुसऱ्या पुष्पात निकम यांनी उपस्थित असालेल्या विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले,



वकिलांनी न्यायाधीशांचे लक्ष वेधण्यासाठी आपल्या आवाजात चढ-उतार ठेवले पाहिजेत. कोणत्याही क्षेत्रात प्रामाणिकपणा आणि आत्मविश्वास महत्त्वाचा असतो. वकील म्हणून सामान्य माणसाला प्रामाणिक सल्ला देणे हे कर्तव्य आहे. खोटी आश्वासने देऊन फसवू नये. २६/११ च्या कसाब खटल्याचा उल्लेख करताना निकम म्हणाले, कसाबला फाशी देणे आव्हानात्मक नव्हते. पण दहशतवादामागील ताकद उघड करणे हे महत्त्वाचे होते. त्यामुळे खटला 'इन कॅमेरा' चालवायचा नाही, असा निर्णय घेतला. एखाद्या खटल्याचा अभ्यास चारही बाजूंनी करायला हवा.

### कांदळवनाच्या जंगलात असा सापडला सैफ अली खानचा हल्लेखोर

■ मुंबई : प्रतिनिधी

बॉलिवूड अभिनेता सैफ अली खान याच्यावर हल्ला करणाऱ्या हल्लेखोराचा नऊ तास ठाण्यातील वेगवेगळ्या खाडी किनारी पोलीस शोध घेत होते. खाडी किनारी असलेल्या कांदळवनामध्ये कोल्हे तसेच हिंस्त्र प्राण्यांचा वावर असतो. त्यामुळे कांदळवनाच्या या जंगलामध्ये हा हल्लेखोर लपला असावा असा सुतरामही संशय पोलिसांना नव्हता. त्यामुळे



खाडी किनारी भागात शोध घेणारे पोलीस कांदळवनाच्या जंगलाच्या दिशेने गेले नव्हते. मात्र, या हल्लेखोराने काही सेकंदासाठी आपला मोबाईल सुरू केला आणि पोलिसांना कांदळवनाच्या जंगालातील मानवी वावराच्या हालचाली दिसून आल्या. त्यानंतर हिरानंदानी इस्टेट परिसारातील दाट कांदळवनाच्या जंगलात शोध घेतला आणि हा हल्लेखोर सापडला. अभिनेता सैफ अली खान याच्या घरामध्ये शिरून एकाने चाकू हल्ला केला होता. मागील तीन दिवसांपासून मुंबई पोलिसांचे पथक हल्लेखोराचा शोध घेत आहेत. काही दिवसांपूर्वी मुंबई पोलिसांनी एका संशयिताला ताब्यात घेतले होते. त्याचा चेहरा हल्लेखोराशी मिळता-जुळता होता. परंतु तो आरोपी नसल्याने पोलिसांनी त्याला सोडून दिले होते.

## माझा मुलगा निर्दोष! ज्यांनी गुन्हे केलेत त्यांना..., कोर्टाच्या निर्णयावर अक्षयच्या आईची भावनिक प्रतिक्रिया

■ मुंबई : गणेश बागडे

बदलापूरमधील शालेय मुलींवर लैंगिक अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदेचा पोलिसांसोबतच्या चकमकीत मृत्यू झाला होता. पोलिसांनी त्याचा एन्काऊंटर केला होता. याप्रकरणी आता न्यायालयाकडून आरोपी अक्षय विरोधकांकडून याचा कडाडून विरोध करण्यात आला होता. तर एन्काऊंटर पूर्वनियोजित असल्याचा आरोपही करण्यात आला. आरोपी दोषी ठरल्यास त्याला शिक्षा देण्याचे काम हे न्यायालयाचे आहे, पण पोलिसांनी कायदा हाती घेतल्याची चूक विरोधकांनी



शिंदेंच्या मृत्यूला पोलिसांना जबाबदार ठरवण्यात आले आहे. स्वतःच्या बचावासाठी अक्षयवर गोळ्या झाडल्याचे पोलिसांचे म्हणणे होते. पण पोलिसांचे स्पष्टीकरण संशयास्पद वाटत असल्याचे न्यायलयीन समितीच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. अक्षयचा पोलिसांच्या एन्काऊंटरमध्ये मृत्यू झाल्यानंतर मोठा गदारोळ झाला होता. अनेकांनी या एन्काऊंटरचे स्वागत केले होते. मात्र याचवेळी दाखवून दिली होती. आता न्यायालयीन समितीच्या अहवालातूनही हा एन्काऊंटर फेक असल्याचे समोर आले आहे. यावर अक्षय शिंदेच्या आईने प्रतिक्रिया दिली आहे. 'माझा मुलगा निर्दोष होता,' असे विधान त्यांनी केले आहे. एका वृत्तवाहिनीशी संवाद साधताना अक्षयची आई म्हणाली, माझा मुलगा निर्दोष होता त्याने गुन्हा केलाच नव्हता. (शेष पृष्ठ ५ वर)

## AI टेक्नॉलॉजी चा वापर करून होणार पंढरपूरच्या आषाढी वारीत गर्दीचे व्यवस्थापन

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

पंढरपूरच्या आषाढी वारीत दरवर्षी लाखो वारकरी सहभागी होतात. विठु माऊलीच्या भेटीसाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून वारकरी टाळ मृदुंगाचा गजर करत भक्तीत तल्लीन झालेले असतात. पंढरपूरमधील आषाढीवारीसह भारतात इतर ४ प्रमुख यात्रा भरत असतात. यामध्ये भाविकांच्या संख्येचा आकडा वर्षानुवर्षे वाढताना दिसतोय. त्यामुळे सरकारकडून गर्दी नियंत्रणासाठी महत्वाची पाऊले उचलण्यात आली आहेत. गर्दी नियंत्रणासाठी आता कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय टेक्नॉलॉजीचा वापर होणार आहे. यासाठी शासन पातळीवर पाठपुरावा सुरू आहे. पंढरपूर येथे होणाऱ्या आषाढीच्या गर्दीचा आकडाही वर्षानुवर्षे वाढताना दिसत आहे. समोर आलेल्या माहितीनुसार आषाढीच्या दिवशी साधारण १५ लाख वारकरी पंढरपुरात असतात. पंढरपूर शहरात प्रामुख्याने चंद्रभागा वाळवंट, नदीच्या पैल तीरावरील भक्ती सागर परिसर, मंदिर परिसर, दर्शन रांग , प्रदक्षिणा मार्ग, शहरातील रस्ते या भागात यातरा काळात भाविकांची मोठी गर्दी जमते. भाविकांच्या सुरक्षेसाठी गर्दीचे नियंत्रण करणे प्रशासनासमोर मोठं आव्हान असतं. यासाठी पोलीस रात्रंदिवस एक करुन पाहारा देत असतात. पण आता पोलिसांच्या मदतीला तंत्रज्ञान धावून येणार आहे. (शेष पृष्ठ ५ वर)



## महापालिका पुन्हा प्लास्टिक बंदीकडे, प्लास्टिक बाळगल्यास भरावा लागेल दंड!

■ मुंबई : मेहुल गायकवाड

मुंबईकरांना सर्वात मोठ्या भेडसावणाऱ्या समस्येपैकी एक म्हणजे प्लास्टिकचा वापर आणि गटारांच्या तोंडावर प्लास्टिक अडकल्यानं पावसाळयात रस्त्यांवर पाणी तुंबण्याची समस्या उद्भवते. प्लास्टिकमुळे अनेक समस्या निर्माण होतात. त्याचं विघटन होत नाही. त्यामुळे आता पुन्हा एकदा मुंबई महापालिका प्लास्टिकचा वापर करणाऱ्यांविरोधात आक्रमक झाली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सुचनांचं पालन न केल्यास प्लास्टिक बाळगणाऱ्यांना मोठा दंड भरावा लागू शकतो. मुंबईमध्ये लघुउद्योग मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. त्यासाठी प्लास्टिकचा वापरही मोठ्या प्रमाणात होत आहे. भाजी विक्रेते, खाद्य पदार्थ विक्रेते आणि हॉटेल व्यावसायिक पार्सलसाठी मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचा वापर करताना दिसत आहेत. मात्र, ठरवून दिलेल्या मानकापेक्षा हलक्या दर्जाचे प्लास्टिक वापरलं जात असल्याचं मुंबई महापालिकेच्या लक्षात आल्यानंतर आता प्लास्टिक वापरणाऱ्यांवर थेट कारवाई करण्यात येणार आहे. प्लास्टिकविषयी जनजागृती होत असतानाच मुंबईतील बाजार, (शेष पृष्ठ ५ वर)




## नव्या प्राप्तिकर कायद्यात सुलभपणा आणण्याचा प्रयत्न, अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधेयक येण्याची शक्यता

■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

केंद्र सरकार संसदेच्या येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात नवीन प्राप्तिकर विधेयक सादर करण्याची



शक्यता आहे, त्यात सध्याच्या प्राप्तिकर कायद्याला अधिक सोपा, सुटसुटीत आणि जनसामान्यांसाठी समजण्यायोग्य करण्याचा प्रयत्न असेल. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी गेल्यावर्षी जुलैमध्ये मांडलेल्या अर्थसंकल्पात सहा दशके जुन्या अशा १९६१च्या प्राप्तिकर कायद्याचा सहा महिन्यांत व्यापक आढावा घेण्याची घोषणा केली होती. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात नवीन प्राप्तिकर कायदा सादर केला जाईल. हा नवीन कायदा असेल, विद्यमान कायद्यात केवळ सुधारणा केली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. सध्या कायदा मंत्रालयाकडून या मसुद्याची पडताळणी केली जात आहे आणि तो अधिवेशनाच्या दुसऱ्या सहामाहीत संसदेत आणला जाण्याची शक्यता आहे, असे सूत्रांनी सांगितले.

अर्थसंकल्पीय अधिवेशन ३१ जानेवारी ते ४ एप्रिल या कालावधीत होणार आहे. केंद्रीय अर्थसंकल्प १ फेब्रुवारी रोजी सादर केले जाईल. प्राप्तिकर कायद्याची भाषा सुलभ, वाद-विवादांमध्ये कपात, संबंधित अनुपालनात कपात आणि अनावश्यक तरतुदी या चार श्रेणींमध्ये सूचना मागवण्यात आल्या होत्या. या कायद्याच्या पुनरावलोकनाबाबत प्राप्तिकर विभागाला सुमारे ६,५०० सूचना प्राप्त झाल्या आहेत. प्राप्तिकर कायदा १९६१, जो प्रत्यक्ष कर – वैयक्तिक प्राप्तिकर, कंपनी कर, (शेष पृष्ठ ५ वर)

## महाकुंभ मेळयात सिलिंडर स्फोटामुळे १८ तंबूंमध्ये भीषण अग्नीतांडव

■ प्रयागराज : वृत्तसंस्था

उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे आयोजित करण्यात आलेल्या महाकुंभ मेळयाला भीषण आग लागली आहे. आगीवर नियंत्रण मिळवण्याकरता अग्नीशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी रवाना करण्यात आल्या आहेत. या आगीचे लोट दूरहून दिसत आहेत. दरम्यान, घटनास्थळी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ पोहोचले असून ते घटनेची चौकशी करत आहेत. प्राथमिक अहवालांनुसार, कॅम्प साइटवर आग लागली आणि त्या भागात बसवलेल्या अनेक तंबूंना या आगीने वेढले. आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांना मदत करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (=ॐइ) चे एक पथकही घटनास्थळी दाखल झाले आहे. आग विझवण्यासाठी स्थानिक प्रशासन, पोलीस आणि अग्निशमन दलाने शर्थीचे प्रयत्न सुरू केले आहेत. या आगीत १८ तंबूंना आग लागली आहे. उत्तर प्रदेशचे मुख्य अग्निशमन अधिकारी प्रमोद शर्मा म्हणाले, महाकुंभमध्ये सिलिंडरच्या स्फोटामुळे आग लागली आहे. तर, प्रयागराज झोनचे एडीजी भानू भास्कर इंडिया टुडेला म्हणाले, महाकुंभमेळयाच्या सेक्टर १९ मध्ये दोन-तीन सिलिंडरचा स्फोट झाला. त्यामुळे कॅम्पमध्ये मोठी आग लागली. आगीवर नियंत्रण मिळण्यात आले आहे. सर्व लोक सुरक्षित आहेत आणि कोणीही जखमी झालेले नाही. 'महाकुंभमेळयाच्या सेक्टर १९ मध्ये दोन सिलिंडरचा स्फोट होऊन शिबिरांमध्ये मोठी आग लागली.



## नाशिकमध्ये ४०० एकरवर साधुग्राम, कुंभमेळयात साधूमहंतांना निवासासाठी हक्काची जागा

■ नाशिक : नितीन देवळेकर

गोदावरी काठावरील नाशिकमध्ये दर १२ वर्षांनी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयात देशभरातील लाखो साधू-महंतांच्या निवासासाठी साधुग्राम नगरी वसविण्यात येणार आहे. त्यासाठी कायमस्वरूपी जागा अधिग्रहित करण्याची तयारी शासनाने केली आहे.

नाशिकमध्ये २०२७मध्ये सिंहस्थ कुंभमेळा होत आहे. त्या दृष्टीने सुमारे ४०० एकर क्षेत्रावर हे साधुग्राम उभारण्याचा प्रस्ताव असून त्यासाठी तपोवन परिसरातील सुमारे ३१८ एकर जागा निश्चित करण्यात आली आहे. हा परिसर ना विकास क्षेत्र असल्याने यातील ५४ एकर जागा महापालिकेने कायमस्वरूपी संपादित केली आहे. उर्वरित २६४ एकर जमीन शेतकऱ्यांकडून अधिग्रहित केली जाणार आहे. ही जमीन केवळ कुंभमेळयाच्या एक वर्षासाठी शेतकऱ्यांकडून भाडेतत्त्वावर घेतली जाते. तीच जागा हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टीडीआर) मोबदल्यात अधिग्रहित करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या बैठकीत या संदर्भात निर्देश देण्यात आले.कुंभमेळयात वर्षभरासाठी साधू-महंतांच्या निवासाकरिता तात्पुरते गाव साकारले जाते. यापूर्वी २०१५-१६मधील सिंहस्थाच्या वेळी ३२३ एकर क्षेत्रात साधुग्राम उभारण्यात आले होते. त्या वेळी तिथे तीन लाख साधू-महंत वास्तव्यास होते. आगामी कुंभमेळयात वैष्णवपंथीय तीन आखाडे आणि ११०० खालसा असे सुमारे चार लाख साधू-महंत वास्तव्यास राहण्याचा अंदाज आहे. त्र्यंबकेश्वरच्या शैवपंथीय आखाड्यांकडे स्वतःची जागा आहे. नाशिकच्या प्रस्तावित साधुग्राममध्ये २३८६ भूखंड असतील. तेथे अंतर्गत रस्ते, तात्पुरते शौचालय, न्हाणीघर बांधणी, (शेष पृष्ठ ५ वर)



## पंकजा मुंडेंचं वक्तव्य, 'मी बीडची कन्या आहे, पालकमंत्रिपद दिलं असतं तर...'


■ बीड : प्रथमेश चव्हाण

महाराष्ट्रात नुकतेच जिल्हयांचे पालकमंत्री कोण हे ठरवलं गेलं आहे. महायुती सरकार स्थापन होऊन दीड महिना झाल्यानंतर पालकमंत्री निश्चित झाले आहेत. यामध्ये चर्चा होती ती बीडच्या पालकमंत्री या पदाची. बीडचं पालकमंत्री हे पद अजित पवारांनी किंवा देवेंद्र फडणवीस यांनी घ्यावं अशी मागणी होत होती. कारण बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची डिसेंबर महिन्यात हत्या करण्यात आली. त्यानंतर या प्रकरणात धनंजय मुंडेंचा निकटवर्तीय वाल्मिक कराड याला खंडणी प्रकरणात अटक झाली. संतोष देशमुख यांची हत्या करणाऱ्या आरोपींनाही अटक झाली. मात्र या प्रश्नावरुन राजकारण रंगलं होतं. दरम्यान पंकजा मुंडे यांनी आता बीडचं पालकमंत्री केलं असतं तर बरं झालं असतं असं म्हटलं आहे. राज्यातील पालकमंत्री पदाची यादी १८ जानेवारीला जाहीर करण्यात आली. यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गडचिरोली जिल्हयाचं पालकमंत्रिपद असणार आहे. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ठाणे आणि मुंबई शहर तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पुणे आणि बीड जिल्हयाचं पालकमंत्रिपद देण्यात आलं आहे. मात्र, पालकमंत्री पदाच्या यादीतून धनंजय मुंडे यांना वगळण्यात आलं आहे. धनंजय मुंडे यांच्याकडे कोणत्याही जिल्हयाचं पालकमंत्रिपद देण्यात आलेलं नाही. (शेष पृष्ठ ५ वर)



महाराष्ट्र क्राईम टाइम्स






# बांगलादेशी घुसखोरांची डोकेदुखी!

अभिनेता सैफ अली खानवर हल्ला करणाऱ्याला पोलिसांनी ठाण्यातून अटक केली. हा हल्लेखोर बांगलादेशी असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. त्यामुळे या प्रकरणाला सांप्रदायिक असे राजकीय वळण देण्याचा प्रयत्न फसला आहे. या प्रकरणातील इतर 'राजकीय' शक्यता प्राथमिक तपासात निकालात निघाल्याने तसा प्रयत्न करणारे राजकारणी तोंडघशी पडले आहेत. या मुद्यावर होणाऱ्या राजकारणापेक्षा इतर देशातील लोकांचे आपल्या देशातील विविध भागात होणारे बेकायदा वास्तव्य ही खूप मोठी चिंतेची बाब आहे. देशातील इतर राज्यांच्या तुलनेत मुंबई आणि महाराष्ट्राला हा धोका मोठा आहे. बांगलादेशातील एखादा व्यक्ती भारतात सहज दाखल होतो, त्याला आंतरराष्ट्रीय यंत्रणा अडवत नाहीत. त्यानंतर तो महाराष्ट्रासारख्या राज्यात येऊन राहतो, त्याही वेळेस कोणाला याबाबत शंका येत नाही. या ठिकाणी तो नोकरी मिळवतो. पुढे मुंबईतल्या प्रतिष्ठित अशा उच्चभ्रूंच्या वस्तीत बाराव्या मजल्यापर्यंत अगदी सेलिब्रिटी आणि नवाब असलेल्या अभिनेत्याच्या घरातील बेडरूमपर्यंत चाकू घेऊन जाऊन पोहचतो आणि हल्ला करतो. हे सगळंच अनाकलनीय आहे. भारतातील घुसखोरीपासून ते प्रतिष्ठित अभिनेत्याच्या घरापर्यंत पोहचलेल्या या हल्लेखोराने आपल्या देशाच्या सीमा सुरक्षेपासून ते स्थानिक सुरक्षा यंत्रणांतील ढिसाळ कारभार आणि फोलपणा समोर आणला आहे.

आपल्या देशात कोणीही कधीही कुठूनही घुसखोरी करू शकते, या ठिकाणी त्याला आधार किंवा पॅन कार्ड सहज मिळू शकते, ते बनावट जरी असले तरी त्याचा रहिवासी पुराव्यापुरता उपयोग करता येऊ शकतो. आपल्या देशात कुणीही गुन्हे करणाऱ्यासाठी दाखल होऊ शकतो आणि गुन्हे करून परदेशात सहज पळून जाऊ शकतो. त्यामुळे परदेशातल्या गुन्हेगारांसाठी आपला देश एखाद्या उद्ध्वस्त धर्मशाळेसारखा झाला आहे. कोणीही येतो कुठेही राहतो, काहीही करतो, चाकू घेऊन हल्ले करतो, अगदी इथल्या प्रतिष्ठित अभिनेत्यावरही हल्ला करू शकतो, 'आओ जावो घर तुम्हारा' असा सगळा मामला आहे.



अशा वेळी आपल्या सीमेवरील आणि अंतर्गत सुरक्षा यंत्रणा, गुप्तहेर यंत्रणा काय करतात, असा प्रश्न पडल्यावाचून राहत नाही. कारण बाहेरून येणारे असेच लोक त्यांच्या सूत्रधारांसाठी स्लिपर सेल्स म्हणून काम करत असतात. भारताची भूमी नेपाळमधील रहिवासी, रोहिंगे, बांगलादेशांसाठी नंदनवन ठरते आहे का? इथं आपण दुसऱ्याच्या घरात, केबिनमध्येही दाखल होतानाही परवानगीशिवाय उंबरठा ओलांडत नाही. परवानगीशिवाय आत येऊ नये, हे वाक्य दरवाजावर लिहिणे आपल्यासाठी भूषणावह असते, मात्र देश नावाच्या आपल्या घरात कोणीही, कसाही कुठूनही बिनदिक्कत शिरकाव करू शकतो. आपल्या राज्यात दाखल झालेल्या याच देशाचे नागरिक असलेल्या परप्रांतीयांच्या विरोधात आपल्याकडे राजकीय आंदोलने होतात, मात्र थेट परदेशातील बेकायदा घुसखोरी करणाऱ्यांचा प्रश्न आपल्यासाठी दुय्यम असतो. निव्वळ धार्मिक मुद्यावरून राजकारण केले जाते. घुसखोरी करणाऱ्याने बेकायदा घुसखोरी करण्यातील गांभीर्यापेक्षा त्याचे नाव काय असते? यात इथल्या राजकीय नेत्यांना रस असतो. आपल्या राज्यातल्या दाटीवाटींच्या वस्त्यांमध्ये असे किती बेकायदा घुसखोर राहत असतील? हा आंतरराष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने चिंतेचा विषय असतो. त्यामुळे न्यायालयात याविषयी चिंता व्यक्त केली जाणे हे इथल्या सगळ्याच सुरक्षा यंत्रणांचे थेट अपयशच मानावे लागेल. कोट्यवधींचा घोटाळा करून, इथल्या नागरिकांना लुबाडून, आर्थिक यंत्रणांच्या हातावर तुरी देऊन आपल्या देशातून कोणीही परदेशात पळून जाऊ शकतो. कोणीही गुन्हे करण्यासाठी परदेशातून आपल्या देशात दाखल होऊ शकतो, ही अवस्था भयंकर आहे. महाराष्ट्रात कोकणपर्यंत परदेशी घुसखोरांनी शिरकाव केला आहे. रत्नागिरीतल्या ग्रामपंचायतीने एका बांगलादेशी घुसखोराला जन्मदाखला दिल्याचे प्रकरण उघड झाले. दुसऱ्या एका प्रकरणात ५ वर्षांची व्हिसाची मुदत संपल्यानंतरही एक बांगलादेशी महिला चिपळूणमध्ये बिनदिक्कतपणे राहात असल्याचे उघड झाले. या महिलेने आधार, पॅनकार्ड असे नागरिकत्वाचे पुरावे बनवून घेतले होते. बेकायदा वास्तव्य करणारे बांगलादेशी किंवा इतर घुसखोर पडेल ती मजुरीची कामे करतात. भिवंडीतून शनिवारी एका बांगलादेशी नागरिकाला ताब्यात घेतले. त्याआधी उल्हासनगरातून बेकायदा वास्तव्य करणाऱ्या १० बांगलादेशींना पकडण्यात आले. भिवंडी, उल्हासनगर, मुंब्रा तसेच इतर भागातही अनेकदा ठिकठिकाणी बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी, रोहिंग्यांवर कारवाई करण्यात आली आहे. मुंबई, ठाणे तसेच राज्याच्या विविध भागात नेपाळमधून आलेल्या नागरिकांनाही कुठलीही चौकशी न करता सहज काम दिले जाते. इमारत बांधकामे, विटभट्टी, किरकोळ वस्तू उत्पादनांच्या ठिकाणी अतिशय स्वस्तात असे परदेशातले मजूर कामाला लावले जातात. स्वस्तात मनुष्यबळ मिळत असल्याने संबंधित मालकही त्यांची चौकशी न करता त्यांना आश्रय देतात. राज्यात बेकायदा वास्तव्य करणारे नायजेरियन, बांगलादेशी, रोहिंग्यांचा प्रश्न आंतरराष्ट्रीय सुरक्षा आणि या देशातील नागरिकांच्या जीविताशी संबंधित आहे. एवढे तरी इथल्या जबाबदार यंत्रणांनी ध्यानात घ्यायला हवे. त्यासाठी इथल्या एका अभिनेत्यावर जीवघेणा हल्ल्या होण्याची वाट पहावी लागते, हा विषय आपल्याकडील यंत्रणांचा ढिसाळपणा उघड करणारा आहे.

# घरबसल्या करता येणार सायबर फसवणुकीची तक्रार: सरकारचे नवीन संचार साथी ॲप?

केंद्र सरकारने १७ जानेवारी २०२५ रोजी संचार साथी मोबाईल ॲप लाँच केले; ज्यामुळे ग्राहकांना सस्पेक्टेड फ्रॉड कम्युनिकेशन (एसएफसी), मोबाईल नंबरचा अनधिकृत वापर यांसारख्या फसव्या क्रियाकलापांची तक्रार करण्यास मदत होणार आहे. हे मोबाईल ॲप Android आणि iOS अशा दोन्हींसाठी उपलब्ध आहे. केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे या ॲप लाँच कार्यक्रमामध्ये म्हणाले, 'संचार साथी मोबाईल ॲप हा वापरकर्त्यांसाठी अनुकूल प्लॅटफॉर्म आहे. हे ॲप दूरसंचार सुरक्षा मजबूत करण्यासाठी आणि नागरिकांना सक्षम करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. हा उपक्रम सर्व वापरकर्त्यांसाठी सुरक्षित वातावरण सुनिश्चित करतो. संचार साथी ॲप प्रत्येकासाठी दूरसंचार नेटवर्कची सुरक्षितता आणि विश्वासार्हता राखण्यासाठी वचनबद्ध आहे.' काय आहे संचार साथी ॲप? या ॲपमुळे सायबर फसवणूक रोखण्यात कशी मदत होईल? त्याविषयी जाणून घेऊ.

संचार साथी हा मोबाईल ग्राहकांना मदत करण्यासाठी, त्यांची सुरक्षा मजबूत करण्यासाठी आणि विविध फसवणूक प्रतिबंध साधने व उपक्रमांबद्दल जागरूकता वाढविण्यासाठी दूरसंचार विभागाचा (DoT) एक ग्राहककेंद्रित उपक्रम आहे. हे ॲप सायबर गुन्हे, आर्थिक फसवणूक, तोतयागिरी किंवा इतर कोणत्याही गैरवापरासाठी कॉल, एसएमएस किंवा व्हॉट्सॲपद्वारे दूरसंचार सेवा वापरकर्त्यांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने केल्या गेलेल्या संशयित फसवणूक संप्रेषणाची तक्रार करण्यास नागरिकांना सुविधा देते. तुमचा हरवलेला/चोरी झालेला मोबाईल हॅण्डसेट ब्लॉक करा : हे ॲप हरवलेल्या/चोरी झालेल्या मोबाईल उपकरणांचे ट्रेसिंग सुलभ करते. त्यामुळे हरवलेला/चोरी झालेला मोबाईल ब्लॉक करणेदेखील सुलभ होते; जेणेकरून हरवलेली/चोरलेली डिव्हायसेस भारतात वापरली जाऊ शकत नाहीत. जर कोणी ब्लॉक केलेला मोबाईल वापरण्याचा प्रयत्न केला, तर तो मोबाईल लगेच ट्रेस केला जाऊ शकतो. तुमच्या मोबाईल हॅण्डसेटची वास्तविकता जाणून घ्या : इंटरनॅशनल मोबाईल इक्विपमेंट आयडेंटिटी (IMEI) नंबरच्या मदतीने मोबाईल हॅण्डसेटची वास्तविकता तपासण्यासाठी हे ॲप मोबाईल ग्राहकांना सुविधा देते. भारतीय क्रमांकासह येणाऱ्या आंतरराष्ट्रीय कॉलची तक्रार करा : हे ॲप नागरिकांना स्थानिक भारतीय क्रमांकाने (+91-xxxxxxxxxx) प्राप्त झालेल्या आंतरराष्ट्रीय कॉलची तक्रार करण्याची सुविधा प्रदान करते. अशा कॉल्सबद्दल अहवाल दिल्याने सरकारला बेकायदा टेलिकॉम सेटअपविरुद्ध कारवाई करण्यास मदत होते.

**संचार साथी ॲप कसे वापरावे?**

१. प्ले स्टोअर किंवा ॲप स्टोअरवरून ॲप डाउनलोड करा. एकदा डाउनलोड झाल्यावर ते उघडा.

२. ॲपची होम स्क्रीन हे ॲप कोणत्या सुविधा देते हे दर्शवेल. 'एक्सप्लोर करा'वर क्लिक करा. एक नवीन पृष्ठ दिसेल आणि ते तुम्हाला नोंदणी करण्यास सांगेल. नोंदणीसाठी पुढे जाण्यासाठी 'प्रोसीड'वर क्लिक करा. जेव्हा तुम्ही यावर क्लिक कराल तेव्हा ॲप फोन लॉग, एसएमएस इत्यादींसारख्या अनेक परवानग्या विचारेल. सर्व परवानग्यांवर 'अनुमती द्या' क्लिक करा. पुढे त्यात तुमचे नाव आणि आडनाव विचारले जाईल. एकदा ही प्रक्रिया पूर्ण झाल्यावर ते १४४२२ वरून एसएमएस पाठवेल. त्यामुळे तुमच्या मोबाईलवर एसएमएस पाठविण्यासाठी




रीचार्ज असल्याची खात्री करा.

३. एकदा नोंदणी केल्यानंतर तुम्ही ऑफर केलेल्या सुविधांचा वापर सुरू करू शकता. तक्रारीसाठी तुम्हाला स्क्रीनशॉट अपलोड करणे आणि फसवणूक संप्रेषणाचे तपशील टाईप करणे आवश्यक आहे. त्यानंतर 'सबमिट'वर क्लिक करणे आवश्यक आहे.

दूरसंचार विभागाच्या डिजिटल इंटेलिजन्स प्लॅटफॉर्मने सायबर गुन्ह्यांचा सामना करण्यासाठी कशी मदत केली?

दूरसंचार विभागाचे डिजिटल इंटेलिजन्स प्लॅटफॉर्म, केंद्रीय सुरक्षा एजन्सी, राज्य पोलीस, जीएसटीएन, बँका, दूरसंचार सेवा प्रदाते, सेबी, सीबीडीटी, डीजीजीआय, आयबी, सीबीआय, व्हॉट्सॲप इत्यादींसह ५२० हून अधिक संस्थांना समर्थन देते. यामुळे सायबर गुन्ह्यांचा मुकाबला करण्यात मोठा हातभार लागला आहे. दूरसंचार विभागाने प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे, 'दूरसंचार विभागाच्या अनेक नागरिककेंद्रित उपक्रमांपैकी संचार साथी उपक्रमाने उल्लेखनीय यश मिळविले आहे. मे २०२३ मध्ये सुरू झालेल्या संचार साथी पोर्टलने (www.sancharsaathi.gov.in) सायबर फसवणुकीशी लढा देण्यासाठी, नऊ कोटींहून अधिक भेटी, २.७५ कोटी फसवी मोबाईल कनेक्शन्स तोडणे आणि २५ लाखांहून अधिक हरवलेली किंवा चोरीला गेलेली उपकरणे सुरक्षित करणे यांसारखे उल्लेखनीय टप्पे गाठण्यात लक्षणीय प्रगती केली आहे. याव्यतिरिक्त सायबर गुन्ह्यांशी जोडलेली १२.३८ लाख व्हॉट्सॲप खाती बंद करण्यात आली आहेत आणि आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी ११.६ लाख बँक खाती गोठवण्यात आली आहेत.'

असोसिएशन ऑफ सर्टिफाईड फायनान्शियल क्राइम स्पेशलिस्ट (ACFCS)च्या कार्यकारी सदस्य शीतल आर. भारद्वाज यांच्या मते, 'या ॲपचे वैशिष्ट्य म्हणजे ते वापरकर्त्यांना त्यांच्या मोबाईल फोन लॉगमधून संशयित फसवे कॉल आणि एसएमएसची तक्रार करण्याची परवानगी देते. हा सक्रिय दृष्टिकोन दूरसंचार-संबंधित घोटाळे आणि वैयक्तिक डेटाचा अनधिकृत प्रवेश कमी करण्यात मदत करतो. संचार साथी ॲप पारदर्शकता, सुरक्षा आणि डिजिटल सक्षमीकरणाचा प्रचार करून, ग्राहक संरक्षण मजबूत करते. या ॲपचा बहुआयामी दृष्टिकोन वापरकर्त्यांना दूरसंचार फसवणुकीपासून वाचवण्यास मदत करतो आणि डिजिटल वापरास प्रोत्साहन देतो. संचार साथी ॲप हे दूरसंचार फसवणूक रोखण्याच्या दिशेने एक स्तुत्य पाऊल आहे. भारताने यासंदर्भात आणखी भर देण्याच्या साठी सायबर फसवणुकीच्या व्यापक समस्येवर लक्ष देण्याची गरज आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे.

टेलिकॉम हा कनेक्टिव्हिटीचा शेवटचा टप्पा आहे आणि एकदा कनेक्ट झाल्यावर मोबाईल फोन विविध सायबर धोक्यांना बळी पडतो. खरोखर विकसित आणि सुरक्षित भारत निर्माण करण्यासाठी भारताने यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. त्या दृष्टीने करणे आवश्यक असलेल्या उपाययोजना खालीलप्रमाणे :

- डिजिटल फसवणुकीपासून नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी एक व्यापक सायबर सुरक्षा ॲप विकसित करणे.
- मजबूत डिजिटल संरक्षण तयार करण्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारीला प्रोत्साहन देणे.
- सायबर गुन्हेगारांच्या पुढे राहण्यासाठी प्रगत तंत्रज्ञान आणि संशोधनामध्ये सतत नवनवीन योजना आणि गुंतवणूक करणे.
- एक सक्रिय आणि सहयोगी दृष्टिकोन हे सुनिश्चित करेल की, नागरिक वाढत्या डिजिटल जगात सुरक्षित राहतील आणि भारताच्या डिजिटल परिवर्तनावर विश्वास वाढवेल.'
- '63SATS' चे कार्यकारी अधिकारी आणि एमडी पठारे यांनी ठळकपणे सांगितले की, संचार साथी ॲप हे दूरसंचार सुरक्षा मजबूत करण्यासाठी आणि प्रत्येकासाठी दूरसंचार संबंधित समस्या सुलभ करण्यासाठी डिझाइन केलेले अनुकूल प्लॅटफॉर्म आहे. ॲपची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :
- हरवलेल्या फोनचा मागोवा घेता येतो.
- CEIR वैशिष्ट्य वापरून, वापरकर्ते त्यांचे हरवलेले किंवा चोरीला गेलेले मोबाईल शोधून ब्लॉक करू शकतात आणि त्याचा गैरवापर अवरोधित करू शकतात.
- ग्राहक त्यांच्या IMEI नंबरद्वारे त्यांचे डिव्हाइस ब्लॉक करून, अनधिकृत वापर प्रतिबंधित करू शकतात.
- सिम कार्डावरील तपशील सुरक्षित करू शकता.
- ॲपवरून वापरकर्त्यांना किती सिम कार्डे सक्रिय आहेत, ते तपासता येते.
- कोणतेही अनधिकृत कनेक्शन शोधण्यात करता येते.
- जर वापरकर्त्यांना त्यांच्या नावावर नोंदणीकृत सिम कार्ड आढळले, तर ते सिम कार्ड निष्क्रिय करण्याची विनंती करता येते.

# भारताचा अंतराळातील अधिकृत पत्ता

भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोने गुरुवारी आपल्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. पृथ्वीपासून तब्बल ४७५ किलोमीटर उंचीवर अंतराळात दोन भारतीय उपग्रह एकमेकांना जोडण्यात (डॉक) इस्रोला यश मिळाले. दोन उपग्रहांचे अंतराळात यशस्वीरित्या डॉकिंग करणारा भारत हा रशिया, अमेरिका आणि चीननंतर चौथा देश बनला आहे. इस्रोची ही कामगिरी अभूतपूर्व असून या कामगिरीची इतिहासात सुवर्ण अक्षराने नोंद होणार आहे. केवळ भारतच नाही, तर जगभरातील अंतराळ संशोधन क्षेत्रातून इस्रोच्या या अद्वितीय कामगिरीचे कौतुक केले जात आहे. अंतराळात भारताचे स्पेस स्टेशन स्थापन करणे आणि चांद्रयान-४ यासारख्या मानवी अंतराळ मोहिमांसाठी डॉकिंग तंत्रज्ञानावर प्रभुत्व मिळवणे ही पहिली पायरी म्हणता येईल. ही पायरी इस्रोने अनेक खडतर आव्हानांवर मात करत गाठली आहे. इस्रोने गेल्या वर्षी स्पेस डॉकिंग प्रयोगाला सुरूवात केली होती. या मोहिमेला स्पेडेक्स असे नाव देण्यात आले होते. या मोहिमेंतर्गत ३० डिसेंबर २०२४ रोजी इस्रोने श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून पीएसएलव्ही-सी ६० रॉकेटचा वापर करून २२० किलो वजनाचे चेसर आणि लक्ष्य असे दोन उपग्रह अंतराळात प्रक्षेपित केले होते.

२ जानेवारीला इस्रोने डॉकिंग चाचणीदरम्यान, दोन्ही उपग्रहांना ३ मीटरपेक्षाही कमी अंतरावर आणले होते. मधल्या काही दिवसांमध्ये दोन्ही उपग्रहातील अंतर कमी-जास्त ठेवण्यात इस्रोला अपयश येत होते, त्यामुळे सातत्याने डॉकिंगची प्रक्रिया पुढे ढकलण्यात येत होती. अखेर गुरुवारी सकाळी दोन्ही उपग्रहांना एकमेकांशी जोडण्यात अर्थात डॉकिंग करण्यात इस्रोला यश आले. इस्रोच्या या मोहिमेचा उद्देश अंतराळात डॉकिंग-अनडॉकिंग तंत्रज्ञानाचे यशस्वीपणे प्रात्यक्षिक करणे हा आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, एका विशिष्ट तंत्रज्ञानाद्वारे दोन्ही उपग्रह अंतराळात एकमेकांशी जोडणे याला डॉकिंग तर दोन्ही उपग्रह अंतराळात विलग करणे याला अनडॉकिंग म्हणतात. पृथ्वीवरील कमांड सेंटरमध्ये बसून अंतराळात कित्येक किमी उंचीवर स्थापित उपग्रहांची एकमेकांशी टक्कर होऊ न देता उपग्रहाचे वेगवेगळे भाग एकमेकांच्या दिशेने आणणे आणि त्यांना अलगदरित्या जोडणे ही प्रक्रिया अत्यंत जटील आणि किचकट असते.



हे तंत्रज्ञान सर्वात पहिल्यांदा विकसित करून अमेरिकेने १९६६ रोजी स्पेस डॉकिंग केले होते. त्यानंतर वर्षभरातच १९६७ साली सोव्हियत रशियाने स्पेस डॉकिंग करून दाखवले होते. पुढच्या काळात अंतराळात स्पेस स्टेशन बनवून या दोन्ही देशांनी अंतराळात अनेकदा मानवी मोहिमा केल्या. पुढे अंतराळवीरांचा सहभाग असलेल्या चांद्रमोहिमांनी मानवजातीचे चंद्राबाबतचे कुतूहल शमवण्यात मोठी भूमिका बजावली.

२००० सालात नवीन आर्थिक शक्ती म्हणून उदयास आलेल्या चीननेही २०११ मध्ये स्पेस डॉकिंग तंत्रज्ञान मिळवले. यापैकी एकाही देशाने हे तंत्रज्ञान एकमेकांशी शेअर केलेले नव्हते. त्या तुलनेत भारताला हा टप्पा गाठण्यासाठी बरीच वर्षे प्रतीक्षा करावी लागली. हे जरी खरे असले, तरी हे तंत्रज्ञान भारताने प्रयोग करत करत स्वतः:च विकसित केलेले आहे, हे विशेष. २०४७ पर्यंत चंद्रावर मानव पाठवण्याचे भारताचे लक्ष्य आहे. त्याआधी अंतराळात स्पेस स्टेशन उभारणे हा महत्त्वाचा टप्पा आहे. स्पेस स्टेशन उभारण्यात भारत यशस्वी ठरल्यास अंतराळवीरांना अंतराळात पाठवणे, यानांची दुरुस्ती करणे, यानांमध्ये इंधन भरणे आदींसाठी भारताला इतर देशांच्या स्पेस स्टेशनवर अवलंबून राहावे लागणार नाही. पृथ्वी आणि चंद्रामधील हे डेस्टिनेशन भविष्यातील भारताच्या अंतराळ मोहिमांना व्यापक रूप देणारे ठरेल.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**निविदा सूचना**

खालील कामाच्या निविदा कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, २ रा माळा, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट मुंबई ४०० ००१ दूरध्वनी क्रमांक २२०१६९७५ हे खालील कामासाठी सा.बां. विभागात योग्य वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविल आहेत. ब-१ कोऱ्या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयातून दिनांक १६.१.२०२५ ते २३.१.२०२५ पर्यंत देण्यांत येईल. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई हे भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा दिनांक २४.१.२०२५ पूर्वी / त्यादिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामांचे नांव | अंदाजित किंमत (रु. लाखांत) | इसारा रक्कम (रुपये) | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | आकाशवाणी आमदार निवास मुंबई येथील रुम नं. ५२०-सी येथे नुतनीकरण करणे. | ८,२४,०५१/- | ८,३००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| २ | एल्फिस्टन टेक्नीकल हायस्कूल मुंबई आवारमधील मुख्य इमारतीमधील संचालक कार्यालय दुरुस्ती करणे. (भाग - १ ते ३) | ५,४१,२८२/- | ५,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ३ | हायकोर्ट मुंबई येथील मुख्य इमारत येथे चेंबर २९ व २ मजल्यावरील कोर्ट रुम ५४ येथे विविध कामे करणे. | ७,२०,४०३/- | ७,३००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ४ | आकाशवाणी आमदार निवास मुंबई येथील रुम नं. ५०७/ब येथे दुरुस्ती करणे. | ८,४३,१२९/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ५ | एल्फिस्टन टेक्नीकल हायस्कूल आवारमधील मुख्याध्यापक क्वार्टर्समध्ये दरवाजा, खिडक्या, पार्टीशन, प्लास्टर, रंगकाम, प्रसाधनगृह दुरुस्ती करणे. (भाग-४ ते ६) | ६,२६,१३१/- | ६,३००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ६ | मंत्रालय विस्तार इमारत मुंबई येथील जिना, पॅसेज, फ्लोरींग, सेफ्टी नेट इ. दुरुस्तीची कामे करणे. | ८,१७,७०३/- | ८,२००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ७ | मंत्रालय मुख्य इमारत ३ मजल्यावरील सहसचिव कॅबिन व गृहनिर्माण विभाग येथे बसण्याची व्यवस्था करणे. | ३,४८,९७४/- | ३,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ८ | आकाशवाणी आमदार निवास मुंबई येथील ४ मजल्यावरील विविध रुम येथे दुरुस्ती करणे. | ८,३८,५०१/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ३३६/- |
| ९ | बी. टी. मार्ग मुंबई येथील विस्तारीत इमारत २ येथे समोरील बाजूस वेदरशेड व स्लाईडींग विंडोची दुरुस्ती करणे. | ८,३९,५६९/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १० | आकाशवाणी आमदार निवास मुंबई येथील २ मजल्यावरील विविध रुम येथे दुरुस्ती करणे. | ८,३८,२९७/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ११ | एल्फिस्टन टेक्नीकल हायस्कूल मुंबई आवारमधील मुख्य इमारत ॲंटी चेंबर ऑफ डायरेक्टर कार्यालय, ड्रेनेज लाईन, चेंबर, प्रसाधनगृह, डी.टी.ई. कार्यालय दुरुस्ती करणे. | ७,४८,७७९/- | ७,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावर सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

जा.क्र. इशवि/निलि/-२००
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
इलाखा शहर विभाग, २ रा माळा,
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई ४०० ००१
दिनांक :- ८/१/२०२५

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/५६८३

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

प्रत :- उप अभियंता, दक्षिण, पश्चिम, मध्य उप विभाग आणि अधीक्षक आमदार निवास मुंबई यांना माहितीसाठी रवाना.
प्रत :- सुचनाफलक

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4, Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate, Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com, Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# जानेवारीतच हिवताप, डेंग्यू, चिकुनगुन्याने नागरिक त्रस्त

■ **मुंबई : मेहुल गायकवाड**

जानेवारी २०२५ च्या पहिल्याच पंधरवड्यात राज्यात हिवताप, डेंग्यू व चिकुनगुन्याचा प्रादुर्भाव दिसू लागला आहे. राज्यात हिवतापाचे ४०१, डेंग्यूचे २१० तर चिकुनगुन्याच्या १३० रुग्ण आढळले आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार राज्यात जानेवारीच्या पहिल्या १५ दिवसांमध्ये हिवतापाचे ४०१ रुग्ण सापडले आहेत. यामध्ये मुंबईमध्ये सर्वाधिक १८५ रुग्ण सापडले असून, त्याखालोखाल गडचिरोलीमध्ये १३८, रायगडमध्ये २६ आणि पनवेलमध्ये २२ रुग्ण सापडले आहेत. त्याचप्रमाणे डेंग्यूचे २१० रुग्ण सापडले आहेत. यामध्ये मुंबईमध्ये ४४, अकोला ४१, नाशिक ३०, मालेगाव १६, सिंधुदुर्ग ११ रुग्ण सापडले आहेत. तसेच राज्यात गेल्या १५ दिवसांत चिकुनगुन्याचे १३० रुग्ण सापडले आहेत. गतवर्षी याच कालावधीत चिकुनगुन्याचे ७७



रुग्ण सापडले होते. त्यामुळे गतवर्षीच्या तुलनेत जानेवारीत चिकुनगुन्याच्या रुग्णांच्या संख्येत दुपटीने वाढ झाली असल्याचे निदर्शनास येत आहे. चिकुनगुन्याचे सर्वाधिक रुग्ण हे अकोल्यात सापडले असून तेथील रुग्णसंख्या ३५ आहे तर मुंबईत १९ रुग्ण सापडले आहेत. तसेच साताऱ्यात १७ रुग्ण सापडले आहेत.

मुंबई: जानेवारी २०२५ च्या पहिल्याच पंधरवड्यात राज्यात हिवताप, डेंग्यू व चिकुनगुन्याचा प्रादुर्भाव दिसू लागला आहे. राज्यात हिवतापाचे ४०१, डेंग्यूचे २१० तर चिकुनगुन्याच्या १३० रुग्ण आढळले आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार राज्यात जानेवारीच्या पहिल्या १५ दिवसांमध्ये हिवतापाचे ४०१ रुग्ण सापडले आहेत. यामध्ये मुंबईमध्ये सर्वाधिक १८५ रुग्ण सापडले असून, त्याखालोखाल गडचिरोलीमध्ये १३८, रायगडमध्ये २६ आणि पनवेलमध्ये २२ रुग्ण सापडले आहेत. त्याचप्रमाणे डेंग्यूचे २१० रुग्ण सापडले आहेत.

# एसटी बस निविदेत घोटाळा नव्याने प्रक्रिया राबविण्याची शिफारस; मुख्यमंत्र्यांचे निर्णयाकडे लक्ष

■ **मुंबई : गणेश बागडे**

**राज्य परिवहन महामंडळात (एसटी) भाडेतत्वावरील १३१० गाड्या घेण्याच्या निविदा प्रक्रियेत मोठ्याप्रमाणात अनियमितता झाली असून ही संपूर्ण प्रक्रियाच रद्द करावी आणि नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्याची महत्वपूर्ण शिफारस चौकशी समितीने मुख्यमंत्र्यांना केली आहे. त्यानुसार समितीच्या अहवालावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कोणता निर्णय घेतात आणि दोषी अधिकाऱ्यांवर काय कारवाई होते याकडे महामंडळाचे लक्ष आहे.**

राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर तत्कालीन मुख्यमंत्री आणि परिवहनमंत्री एकनाथ शिंदे यांना अंधारात ठेवून १३१० एसटी गाड्या भाडेतत्वावर घेताना काही विशिष्ट ठेकेदांवर मेहरबानी दाखविताना निविदा प्रक्रियेत परस्पर बदल केल्याची आणि त्यामुळे महामंडळास येत्या काळात सुमारे दोन हजार कोटींचा आर्थिक फटका बसण्याची गंभीर बाब 'लोकसत्ता'ने '२ हजार कोटींचा एसटी घोटाळा' ( १ जानेवारी) उघडकीस आणला होता. निर्णय काय होता?सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार महामंडळाच्या नोव्हेंबर २०२३मध्ये झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत २० विभागांसाठी विभागनिहाय १३१० गाड्या भाडेतत्वावर घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. महामंडळाच्या या प्रस्तावास फेब्रुवारी २०२४मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री आणि परिवहनमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्यता दिली. मात्र त्यानंतर महिनाभरात सूत्रे फिरली



आणि महामंडळाच्या परिवहन विभागाने मूळ प्रस्तावात बदल करीत विभाग निहाय ऐवजी मुंबई, पुणे-नाशिक आणि अमरावती-नागपूर अशा तीन समुहासाठी (क्लस्टर) निविदा काढण्याचा प्रस्ताव तयार केला. त्याचप्रमाणे ठरावीक ठेकेदाराना फायदा होईल अशा पद्धतीने निविदेतील अटी-शर्थीमध्येही बदल करण्यात आले.निविदेतील अटींमध्ये बदल करताना सर्व २० विभागांना गाड्यांची गरज असून प्रत्येक विभागात किमान तीन निविदाकार लागणार असल्याने प्रक्रियेला विलंब होईल. तसेच सर्व विभागांसाठी एकच निविदा काढल्यास किंमतवाढ होईल असा दावा करण्यात आला होता. मात्र महामंडळातील काही अधिकाऱ्यांनी समुह निविदेच्या प्रस्तावास विरोध करीत हा प्रस्ताव पुन्हा संचालक मंडळासमोर मांडण्याची भूमिका घेतली. तेव्हा संबंधित अधिकाऱ्यांचीच अन्यत्र बदली करण्यात आली आणि तेथे मर्जीतील अधिकाऱ्यांना बसवून ही निविदा प्रक्रिया राबवण्यात आल्याची बाब समोर आली होती. महामंडळाच्या या घोटाळयामुळे मे. अँथोनी रोड ट्रान्सपोर्ट सोलूशन प्रा. लि., मे. सीटी लाईफलाईन ट्रॅव्हल्स प्रा.लि. आणि मे. ट्रॅव्हल टाईम प्रा. लि. या तीन कंपन्यांनाच लघुत्तम निविदाकार म्हणून प्रत्येकी एक यप्रमाणे तिघांना तीन समुहातील कंत्राटे मिळाली आणि गाड्या पुरवण्याचे इरादात्रही देण्यात आले होते.

# एमएमआरसीकडून नरीमन पॉईंट येथील भूखंड ९० वर्षांसाठी भाड्याने देण्यासाठीची निविदा रद्द

■ **मुंबई : सम्यक कासारे**

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून (एमएमआरसी) नरीमन पॉईंट येथील ४.२ एकराचा भूखंड ९० वर्षांसाठी भाडेतत्वावर देण्यासाठी स्वारस्य निविदा मागविण्यात आली होती. पण आता मात्र ही निविदा अचानक रद्द करण्यात आली असून काही प्रशासकीय कारणांमुळे निविदा रद्द करत असल्याचे एमएमआरसीकडून स्पष्ट करण्यात आले आहे. एमएमआरसीकडून कुलाबा-वांद्रे-सीप्झ असा ३३.५ किमीचा भुयारी मेट्रो मार्ग बांधला जात आहे. यातील आरे ते बीकेसी असा पहिला टप्पा वाहतूक सेवेत दाखल झाला आहे. उर्वरित टप्पा लवकरच वाहतूक सेवेत दाखल होणार आहे. दरम्यान या मार्गिकेसाठी आलेला खर्च वसूल करण्यासाठी एमएमआरसीने अनेकविध पर्याय पुढे आणाले आहेत. त्यानुसार या मार्गिकेदरम्यान एमएमआरसीकडे हस्तांतरीत झालेल्या भूखंडांचा व्यावसायिक वापर करत भूखंड भाडेतत्त्वावर देण्यात येणार असून त्यातून महसूल मिळविण्याचा निर्णय एमएमआरसीने घेतला आहे. मेट्रो ३ मार्गिकेतील अनेक ठिकाणच्या भूखंडांचा असा वापर केला जाणार आहे. या निर्णयानुसार नरीमन पॉईंट येथील ४.२ एकरचा भूखंड ९० वर्षांसाठी भाडेतत्वावर देण्यासाठी काही महिन्यांपूर्वी एमएमआरसीने स्वारस्य निविदा मागविल्या होत्या. यातून एमएमआरसीला ५१७३ कोटी रुपये इतका महसूल मिळणे अपेक्षित आहे. मात्र आता ही स्वारस्य निविदा रद्द करण्यात आली आहे. एमएमआरसीकडून नुकतीच ही स्वारस्य निविदा रद्द करण्यात आल्याचे वृत्तपत्रातील जाहिरातीद्वारे जाहीर करण्यात आले आहे. प्रशासकीय कारणामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचेही यात नमूद करण्यात आल आहे. नेमके यामागे प्रशासकीय कारण काय आणि ही निविदा कायमस्वरुपी रद्द करण्यात आली आहे का याबाबत एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांना विचारले असता त्यांनी निविदा रद्द करण्यात आल्याचे सांगितले. मात्र कुठेही प्रकल्प रद्द करण्यात आलेला नाही किंवा निविदा कायमस्वरुपी रद्द करण्यात आलेली नाही असे स्पष्ट केले आहे.

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून रिलायन्स जिओ कंपनीवर कारवाईचे पाऊल

■ **मुंबई : राकेश गायकवाड**

हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमधील रिलायन्स जिओ कंपनीच्या कार्यालयामुळे ध्वनिप्रदूषण होत असल्याची बाब समोर आली आहे. या प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कंपनीला नोटीस बजावली आहे. दरम्यान, कंपनीने नियमांची पूर्तता करण्यात येईल, अशी भूमिका घेतली आहे. हिंजवडी आयटी पार्कमध्ये रिलायन्स जिओचे कार्यालय आहे. या कार्यालयात शीतकरण यंत्रणा म्हणजेच चिलर बसविण्यात आले आहेत. या चिलरचा आवाज मोठा असल्याने आजूबाजूच्या रहिवाशांना याचा त्रास होत होता. त्यामुळे कार्यालयाच्या शेजारील ब्लू रिज सोसायटीतील नंदिनी चक्रवर्ती यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे २०२३ मध्ये तक्रार केली होती. या तक्रारीनंतर मंडळाच्या अधिकाऱ्यांनी रिलायन्स जिओच्या कार्यालयाला भेट देऊन तपासणी केली होती. तेथील आवाजाची पातळी ७४ डेसिबल असल्याचे तपासणीत




**आवाजाची मर्यादा पातळी किती?**

**विभाग - दिवसा - रात्री (डेसिबलमध्ये)**
**औद्योगिक - ७५ - ७०**
**व्यावसायिक - ६५- ५५**
**निवासी - ५५ - ४५**
**शांतता क्षेत्र - ५० - ५०**

समोर आले. या प्रकरणी २६ डिसेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र प्रदूषण मंडळाच्या मुंबईतील मुख्यालयात सुनावणी झाली. ही सुनावणी दूरदृश्य प्रणालीद्वारे झाली. या सुनावणीला रिलायन्स जिओचे अधिकारीही उपस्थित होते. या सुनावणीनंतर मंडळाने जिओला नोटीस बजावली आहे. कार्यालयामुळे निर्माण होणारे ध्वनिप्रदूषण कमी करण्याबाबतचा कृती आराखडा सात दिवसांत सादर करण्याचे निर्देश मंडळाने कंपनीला दिले आहेत. याचबरोबर आवाज कमी करणारी यंत्रणा बसविण्यासाठी ३ महिन्यांची मुदतही कंपनीला देण्यात आली आहे. याबाबत रिलायन्स जिओच्या प्रवक्त्याने नियमांची पूर्तता दिलेल्या मुदतीत केली जाईल, असे स्पष्ट केले.

*'रिलायन्स जिओने ध्वनिप्रदूषण कमी करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या, याचा अहवाल मंडळाकडे १५ दिवसांत सादर करावा. त्यांनी मंडळाच्या निर्देशांचे पालन न केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाईचे पाऊल उचलले जाईल.* — **जगन्नाथ साळुंखे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ**

# प्रकल्प नोंदणी सुलभ व्हावी यासाठी महारेराचे आता विशेष खुले सत्र

■ **मुंबई : प्रथमेश चव्हाण**

महारेरा गृहप्रकल्प नोंदणी सुलभ व्हावी यासाठी आता महारेराने विकासकांसाठी प्रत्येक महिन्यात नागपूर आणि पुणे येथे विशेष खुले सत्र घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार पहिले सत्र २२ जानेवारीला नागपूरात होणार आहे. महारेरा मुख्यालयातील वरिष्ठ अधिकारी विकासकांच्या शंकांचे निरसन करणार आहेत. रेरा कायद्यानुसार राज्यतील प्रत्येक गृहप्रकल्पास नोंदणी बंधनकारक आहे. ही नोंदणी जलद आणि सुलभ व्हावी यासाठी महारेराने विकासकांच्या संघटनांची स्वयंविनियामक संस्था म्हणून नियुक्ती केली आहे. या स्वयंविनियामक संस्थेतील प्रतिनिधींची नियुक्ती करत त्यांच्या माध्यमातून प्रकल्प नोंदणीसाठी विकासकांना मदत केली जाते, असे असले तरी विकासकांना पुरेशी माहिती नसल्याने नोंदणी करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. ही बाब लक्षात घेत विकासकांच्या अडचणी सोडविण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी महारेराने नागपूर आणि पुण्यात प्रत्येक महिन्याला एक विशेष खुले सत्र आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे.

# सार्वजनिक ठिकाणी लावलेल्या बेकायदा झेंड्याबाबतच्या तक्रारींवर काय कारवाई केली? उच्च न्यायालयाचा महानगरपालिकेला सवाल

■ **मुंबई : विशाल कारंडे**

सार्वजनिक ठिकाणी बेकायदेशीरीत्या लावलेल्या झेंड्यांबाबत करण्यात आलेल्या तक्रारी हाताळण्यासाठी यंत्रणा आहे का ? अशा बेकायदा झेंड्यांवर काय कारवाई केली ? अशी विचारणा उच्च न्यायालयाने मुंबई महानगरपालिकेला केली. तसेच, त्याबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. गृहनिर्माण संस्थेच्या प्रवेशद्वारावर बेकायदेशीररीत्या लावलेल्या झेंड्यांवर कोणतीही कारवाई न करणाऱ्या महापालिकेच्या निष्क्रियतेविरुद्ध हरेश गगलानी यांनी उच्च न्यायालयात धाव घेऊन याचिका केली आहे. या याचिकेची न्यायमूर्ती रेवती डेरे आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने दखल घेतली. तसेच, अशा पद्धतीने लावलेल्या



बेकायदा झेंड्यांबाबत येणाऱ्या तक्रारी हाताळण्यासाठी यंत्रणा आहे का ? अशी विचारणा करून उपरोक्त आदेश महापालिकेला दिले. त्याचप्रमाणे, बेकायदेशीर फलकांशी संबधित अन्य एका प्रकरणात न्यायालयाने दिलेल्या आदेशांची प्रत अधिकृत संकतेस्थळांवर आणि एक्स हँडलवर टाकण्याच्या आदेश देण्यात आला होता. त्याची आठवणही न्यायालयाने यावेळी महापालिकेला करून दिली. तत्पूर्वी, गृहनिर्माण संस्थेच्या प्रवेशद्वारावर झेंडे लावण्यासाठी संबंधित व्यक्तीने आवश्यक ती परवानगी घेतली होती का ? अशी विचारणा महापालिका प्रशासनाकडे करूनही त्याला कोणताही प्रतिसाद देण्यात आला नाही. तसेच, वर्ष उलटूनही हे झेंडे काढण्यात आलेले नाहीत. त्यामुळे, उपरोक्त विचारणा महापालिकेकडे करण्यात आल्याचे याचिकाकर्त्याच्या वतीने न्यायलयला सांगण्यात आले. त्याची दखल घेऊन सार्वजनिक ठिकाणी बेकायदा झेंडे लावण्याची परवानगी देता येते का? हे तपासण्याचे आदेश दिल्याची आठवण न्यायालयाने महापालिकेच्या वकिलांना करून दिली. परंतु, यासंदर्भात परवाना, इमारत यांसारख्या विभागाकडे चौकशी केली असता अशी कोणतीही परवानगी देण्यात आली नसल्याचे वकिलांनी न्यायालयाला सांगितले. त्याची दखल घेऊन न्यायालयाने महापालिकेला याचिकेत उपस्थित मुद्यांवर भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले.

**महाराष्ट्र शासन**

इलाखा शहर विभाग, (सा.बां.)

**ई -निविदा सुचना क्र. ६४ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रू. लक्ष |
|---|---|---|
| १ | जे.बी. मार्ग रस्त्यालगत असलेल्या शासकीय इमारत सुनिती सदनिका क्र. १ येथे वॉल पॅनेलिंगचे नुतनीकरण व सिमेंट गिलावा, रंगकाम, पॉलिश काम करणे. | १९.६४ |
| २ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे विस्तार इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावरील रुम क्र. १०१ ते १०८ येथे नुतनीकरण करणे. | ४०.७५ |
| ३ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे विस्तार इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावरील रुम क्र. ११५ ते ११७ येथे नुतनीकरण करणे. | ३६.६१ |
| ४ | जे.बी. मार्ग रस्त्यालगत असलेल्या शासकीय इमारत सुनिती सदनिका क्र. २ येथे वॉल पॅनेलिंगचे नुतनीकरण व सिमेंट गिलावा, रंगकाम, पॉलिश काम करणे. | ४०.७० |
| ५ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे मुख्य इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावरील रुम क्र. १०३ येथे कार्यालयाचे नुतनीकरण करणे. | ४१.९६ |
| ६ | जे.बी. मार्ग रस्त्यालगत असलेल्या शासकीय इमारत सुनिती सदनिका क्र. ६ येथे वॉल पॅनेलिंगचे नुतनीकरण व सिमेंट गिलावा, रंगकाम, पॉलिश काम करणे. | २९.२५ |
| ७ | मा. मुख्यमंत्री महोदय यांचे चेंबर, अँटीचेंबर, पॅसेजचे कारपेट, प्रतिक्षालय इ. नुतनीकरण करणे . | ३०.४१ |
| ८ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे विस्तार इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावरील रुम क्र. १३९ येथे नुतनीकरण करणे. | ३२.१८ |
| ९ | जे.बी. मार्ग रस्त्यालगत असलेल्या शासकीय इमारत सुनिती सदनिका क्र. ९ येथे वॉल पॅनेलिंगचे नुतनीकरण व सिमेंट गिलावा, रंगकाम, पॉलिश काम करणे. | १९.३२ |
| १० | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे विस्तार इमारतीमध्ये तिसऱ्या मजल्यावरील रुम क्र. ३०२ ते ३०७ येथे नुतनीकरण करणे. | ३३.१९ |
| ११ | शासकीय बंगला देवगिरी येथे अंतर्गत व बाह्य भागामधील सिमेंट गिलावा नव्याने करणे, जमिनीवरील व भिंतीवरील फरशांची दुरूस्ती करणे, काही दरवाजे व खिडक्यां नव्याने बसविणे, प्रसाधनगृहांचे नुतनीकरण करणे, बंगल्याच्या लाकडी कपाटांची दुरूस्ती करणे तसेच वॉल पॅनलिंग नव्याने करणे इ. स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. | ४१.७६ |
| १२ | मा. उपमुख्यमंत्री महोदय यांचे चेंबर, अँटीचेंबर, कॉन्फरन्स हॉल, पॅसेजचे नुतनीकरण करणे . | ५४.३७ |
| १३ | शासकीय बंगला मेघदूत येथे अंतर्गत व बाह्य भागामधील सिमेंट गिलावा नव्याने करणे, जमिनीवरील व भिंतीवरील फरशांची दुरूस्ती करणे,काही दरवाजे व खिडक्यां नव्याने बसविणे, प्रसाधनगृहांचे नुतनीकरण करणे,बंगल्याच्या लाकडी कपाटांची दुरूस्ती करणे,वॉल पॅनलिंग नव्याने बसविणे, प्रसाधनगृहांचे नुतनीकरण करणे,बंगल्याच्या लाकडी कपाटांची दुरूस्ती करणे,वॉल पॅनलिंग नव्याने करणे तसेच सोफा सेट व खुर्च्यांचा पुरवठा करणे इ. स्थापत्य दुरुस्तीची कामे करणे. | ४१.८७ |
| १४ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे मुख्य इमारतीमध्ये तळ मजल्यावरील कार्यालयांचे नुतनीकरण करणे.एम-२ | ४३.२१ |
| १५ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे विस्तार इमारतीमध्ये दुसऱ्या मजल्यावरील रुम क्र. २०५ ते २०७ येथे नुतनीकरण करणे. | ३५.७७ |
| १६ | शासकीय बंगला सेवासदन येथे अंतर्गत व बाह्य भागामधील सिमेंट गिलावा नव्याने करणे, जमिनीवरील व भिंतीवरील फरशांची दुरुस्ती करणे, काही दरवाजे व खिडक्यां नव्याने बसविणे, प्रसाधनगृहांचे नुतनीकरण करणे, बंगल्याच्या लाकडी कपाटांची दुरुस्ती करणे तसेच वॉल पॅनलिंग नव्याने करणे इ. स्थापत्य दुरुस्तीची कामे करणे. | ४१.५६ |
| १७ | मलबार हिल येथील शासकीय बंगला रॉयलस्टोन मधील अंतर्गत व बाह्य भागाचे दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | ४१.९७ |
| १८ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे मुख्य इमारतीमध्ये तळ मजल्यावरील कार्यालयांचे नुतनीकरण करणे. एम-१ | ४१.०९ |
| १९ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे विस्तार इमारतीमध्ये दुसऱ्या मजल्यावरील रुम क्र. २०१,२०२,२१२ येथे नुतनीकरण करणे. | ३१.८७ |
| २० | मलबार हिल येथील शासकीय बंगला पर्णकुटी मधील अंतर्गत व बाह्य भागाचे दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | ५४.१० |
| २१ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे मुख्य इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावरील रुम क्र. १०१ येथे कार्यालयाचे नुतनीकरण करणे. | ३३.१२ |
| २२ | मलबार हिल येथील शासकीय बंगला चित्रकुट मधील अंतर्गत व बाह्य भागाचे दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | ४२.३६ |
| २३ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे विस्तार इमारतीमध्ये दुसऱ्या मजल्यावरील रुम क्र. २४१ येथे नुतनीकरण करणे. | ३८.६४ |
| २४ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे मुख्य इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावरील रुम क्र. १०२ येथे कार्यालयाचे नुतनीकरण करणे. | ४०.३६ |
| २५ | मलबार हिल येथील शासकीय बंगला जेतवन मधील अंतर्गत व बाह्य भागाचे दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | ४३.३१ |
| २६ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे विस्तार इमारतीमध्ये दुसऱ्या मजल्यावरील रुम क्र. २२१ येथे नुतनीकरण करणे. | ३४.१३ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. १५.१.२०२५ ते दि.२९.१.२०२५ पर्यंत.
ई-निविदा उघडणे- दि. ३०.१.२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता

निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्रं. इशवि/निलि/ २६८
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : १३/१/२०२५

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/५६४७

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.., काँग्रेस सरकारने देशातील जनतेला वंचित ठेवले

■ **ठाणे : तृप्ती गोरे**

**स्वामित्व योजना प्रॉपर्टी कार्ड ही योजना लोकांसाठी संजीवनी ठरेल. ही योजना यापुर्वीच राबविणे गरजेचे होते. परंतु ५० ते ६० वर्ष काँग्रेस सरकार होते आणि त्यांनी देशातील लोकांना वंचित ठेवले, असा आरोप उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातील कार्यक्रमात बोलताना केला.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी देशातील ५० हजार गावांमधील ५८ लाख लाभार्थींना स्वामित्व प्रॉपर्टी कार्ड वितरण करण्यात आले. ऑनलाईनद्वारे झालेल्या या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे ठाणे येथून सहभागी झाले होते. त्यांच्या हस्ते देखील ठाणे जिल्हयातील स्वामित्व प्रॉपर्टी कार्डचे प्रातिनिधिक वाटप करण्यात आले. या कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी काँग्रेसवर टिका केली. स्वामित्व योजना प्रॉपर्टी कार्ड चे वाटप ऑनलाइनच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. ५० हजार गावांमध्ये



६५ लाख ग्रामस्थांना या प्रॉपर्टी कार्डचे वितरण झाले. या कार्डमुळे जागेची हद्द, घरांची हद्द आणि सीमांकन याबद्दल चे वाद संपुष्टात येतील आणि त्याचबरोबर प्रत्येकाला मालकी हक्क मिळेल. त्यामुळे आजचा दिवस महाराष्ट्र नाही तर देशासाठी ऐतिहासिक आहे, असे शिंदे म्हणाले.

प्रॉपर्टी कार्डमुळे अनेकांनी कर्ज घेऊन व्यवसाय सुरू केले आणि त्यांनी व्यवसायात प्रगतीही केली आहे. अतिशय ऐतिहासिक अशी हि योजना आहे. यापुर्वीच ही योजना राबविणे गरजेचे होते. परंतु ५० ते ६० वर्ष काँग्रेसचे सरकार होते आणि त्यांनी देशातील लोकांना वंचित ठेवले, अशी टिका त्यांनी केली. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी हे पंतप्रधान झाले आणि त्यांनी अनेक योजना सुरू केल्या. २०२२ मध्ये त्यांनी स्वामित्व प्रॉपर्टी कार्ड योजनेची सुरूवात केली. त्याला मूर्त रूप आले आहे. गाव समृद्ध झाले की देश समृद्ध होतो, म्हणूनच देशाचा विकास करायचा असेल तर गावापासून करायला हवा. त्याचीच सुरूवात या योजनेच्या माध्यमातून झाली आहे. देशासह राज्यातील नागरिकांना योजनाचा फायदा होईल आणि त्यांच्यासाठी ही योजना संजीवनी ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

# घरांचे दर कमी करण्याची कार्यवाही नाही; सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालकांचे स्पष्टीकरण

■ **नवी मुंबई : धनश्री सट्टा**

सिडको मंडळाच्या 'माझ्या पसंतीचे सिडकोचे घर' योजनेतील घरांचे दर कमी करण्याबाबत कार्यवाहीचे कोणतेही आदेश राज्य सरकारकडून मिळाले नसल्याचे स्पष्टीकरण सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक शांतनू गोयल यांनी दिले. शुक्रवारी ते पत्रकार परिषदेत बोलत होते. दरम्यान, या घरांच्या किमती कमी करण्यासाठी सिडकोच्या संचालक मंडळात सूचना देऊ तसेच मुख्यमंत्री आणि नगरविकास मंत्र्यांची लवकरच भेटून चर्चा करु, असे आश्वासन सिडकोचे माजी अध्यक्ष आणि विद्यामान मंत्री संजय शिरसाट यांनी तीन दिवसांपूर्वी दिले होते.

सोडती मधील सर्वच घरांच्या किमती सर्वसामान्यांना परवडणाऱ्या असल्याची माहिती सह व्यवस्थापकीय संचालक गोयल यांनी शुक्रवारच्या पत्रकार परिषदेत दिली. खासगी विकसकांपेक्षा परवडणाऱ्या दरात सिडकोने ही घरे उपलब्ध करुन दिली आहेत. तळोजा आणि खारघर या दोन उपनगरांना जोडणाऱ्या उड्डाणपुलाचे काही बांधकाम सुरू आहे. पुढील वर्षी या




मार्गाचे काम पूर्ण झाल्यावर हा रस्ता वाहतुकीसाठी खुला होईल. त्यानंतर अवघ्या १० मिनिटांत खारघरमधून तळोजा गाठता येईल. त्यामुळे यापुढे तळोजा परिसराला खारघर पूर्व असेच बोलता येईल असेही गोयल म्हणाले. सिडकोच्याघरांसोबत महागृहनिर्माण परिसरात व्यायामशाळा, वाहनतळ, बगीचा अशा विविध सुविधाही सामान्यांना मिळणार आहे. पहिल्या दोन वर्षांचे मासिक मेंटनेंस सिडको आकारणार नसल्याकडेही गोयल यांनी लक्ष वेधले.

# विमानतळबाधितांचे शंभर दिवसांचे आंदोलन मागे: सिडकोची आंदोलकांशी चर्चा फलदायी

■ **उरण : सचिन कदम**

आपल्या विविध मागण्यांसाठी ७ ऑक्टोबर पासून सिडको भवनच्या प्रवेशद्वारासमोर सुरू असलेले शंभर दिवसांचे नवी मुंबई विमानतळ बाधितांचे आंदोलन अखेर गुरुवारी मागे घेण्यात आले. मात्र यावेळी झालेल्या चर्चेतील आश्वासनाची अंमलबजावणी सिडकोने न केल्यास पुन्हा एकदा आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. येत्या एप्रिल २०२५ ला नवी मुंबई विमानतळ कार्यान्वित होणार आहे. मात्र या विमानतळासाठी आपले सर्वस्व असलेल्या आपल्या जमिनी आणि राहती घरे देणाऱ्या भूमिपुत्रांचे पुनर्वसन अपूर्ण आहे. त्यांचे प्रथम योग्य पुनर्वसन करावे या प्रमुख मागणीसाठी नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ कमिटी व किसान सभा यांच्यावतीने धरणे आंदोलन सुरू करण्यात आले होते. हे आंदोलन तब्बल शंभर दिवस सुरू होते. याची दखल घेत सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक शंतनू गोयल यांच्या सोबत आंदोलन कर्त्यांची बैठक पार पडली. या बैठकीत विमानतळ बधितासाठी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचे, शून्य पात्रता धारक प्रकल्पग्रस्तांचे वैयक्तिक अर्ज तपासणी, वाढीव घर भाडे देण्याचे तसेच वाघीवली गाव पुनर्वसनासाठी नव्याने प्रस्ताव पाठविण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे.



# कल्याणमधील महाराष्ट्रीयन कुटुंबावरील हल्ला प्रकरणी: पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही चित्रीकरण जतन करा, उच्च न्यायालयाचे आदेश

■ **कल्याण : आकाश कांबळे**

कल्याणमधील महाराष्ट्रीय कुटुंबावरील हल्ल्याप्रकरणी पोलीस ठाण्यातील १८ आणि १९ डिसेंबर रोजीचे सीसीटीव्ही चित्रिकरण जतन करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने नुकतेच खडकपाडा पोलिसांना दिले. महाराष्ट्रीय कुटुंबाला मारहाण केल्याप्रकरणी शासकीय अधिकारी अखिलेश शुक्लासह अन्य आरोपींवर खडकपाडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. परंतु, पोलिसांकडून प्रकरणाचा योग्य तपास केला जात नसल्याचा आरोप करून पीडित मराठी कुटुंबाने तपास गुन्हे शाखेकडे वर्ग करण्याची मागणी केली आहे.

या हल्ल्यात जखमी झालेल्या अभिजीत देशमुख यांचा भाऊ धीरज याने पोलिसांच्या प्रकरणातील भूमिकेवर प्रश्न उपस्थित करून उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. तसेच, प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यासह आरोपींवर मोक्का लावण्याची आणि



कर्तव्यात कसूर करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याच्या विभागीय चौकशीची मागणी केली आहे. न्यायमूर्ती रेवती डेरे आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठापुढे ही याचिका सुनावणीसाठी आली असता खंडपीठाने त्याची दखल घेतली व सरकारसह इतर प्रतिवादींना नोटीस बजावून खडकपाडा पोलिसांना उपरोक्त आदेश दिले.

योगीधाम अजमेरा हाईट्स संकुलात १८ डिसेंबर रोजी शुक्ला आणि कालविकट्टे कुटुंबात उदबत्तीच्या धुरावरून झालेल्या वादात अभिजीत देखमुख यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यामुळे संतापलेल्या शुक्ला यांनी त्यांच्या दहा समर्थकांकरवी देशमुख बंधूंना बेदम मारहाण करून धारदार शस्त्राने त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात अभिजीत जखमी झाले. त्यानंतर, या प्रकरणी खडकपाडा पोलिसांत शुक्ला आणि अन्य आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला गेला. संघटीत गुन्हेगारीचे हे प्रकरण असल्याने आरोपींवर मोक्का लावण्याची मागणी आपण पोलिसांकडे केली होती. परंतु, पोलिसांनी त्यादृष्टीने काहीच प्रयत्न केले नाहीत. त्यामुळे, पोलीस उपायुक्तांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांशी आपण संपर्क साधला, त्यांनी तपास अधिकाऱ्यांना जबाब नोंदवण्याचे आदेश दिले.

# विरार फलाटावरून बाहेर पडण्यासाठी खासगी जागेतून नवीन रस्ता; अडथळयातून प्रवाशांची सुटका

■ **वसई : सुचिता देशमुख**

विरार स्थानकाच्या पश्चिमेकडे असलेल्या गर्दी आणि अडथळयातून बाहेर पडणे आता सोयीचे झाले आहे. पश्चिम रेल्वेने विरारच्या फलाट क्रमांक २ मधून बाहेर जाण्यासाठी रस्ता तयार करून दिला आहे. फलाटाला लागून असलेल्या ठाकूर आर्केडच्या खासगी जागेतून हा रस्ता काढला आहे. यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. विरार रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेकडून बाहेर पडणे प्रवाशांसाठी मोठे दिव्य असतं. पश्चिमेला मुळात रस्ता अरुंद आहे. त्यात फेरिवाल्यांचे अतिक्रमण आणि रिक्षाचालकांनी जागा व्यापलेली असते. त्यामुळे स्थानकातून बाहेर पडताना प्रवाशांन मोठी कसरत करावी लागते. त्यातच विरार स्थानकाच्या पुनर्निमाणाचे काम



सुरू आहे. यामुळे फलाटावरून पश्चिमेकडे बाहेर निघण्यासाठी प्रवाशांना खूप अडचणी सहन कराव्या लागतात आणि त्यात वेळ जाते. गर्दीच्या वेळी धक्काबुक्की होते असते. महिला प्रवासी त्यात भरडले जातात. यासाठी पश्चिम रेल्वेने फलाट क्रमांक २ मधून बाहेर जाण्यासाठी रस्ता तयार केला आहे.

# फेब्रुवारी अखेरपर्यंत भूमिपुत्रांचे प्रश्न सोडविणार; वन मंत्री गणेश नाईक यांचे हुतात्मादिनी आश्वासन

■ **उरण : सतिश सोनावणे**

नवी मुंबईतील भूमिपुत्रांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी राज्याच्या मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेण्यात येईल असे आश्वासन राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी गुरुवारी जासई येथील १९८४ च्या शेतकरी हुतात्मा दिनी केले. १६ जानेवारी १९८४ ला राज्य सरकार आणि सिडकोच्या



विरोधात माजी खासदार दि. बा. पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी आंदोलन उभारण्यात आले होते. या आंदोलनातील पाच शेतकरी हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी जासई येथील हुतात्मा स्मारकात हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली. प्रथम स्मारकाच्या प्रांगणातील हुतात्म्यांना तसेच छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहू, सावित्रीबाई आंबेडकर,कर्मवीर व दि. बा. पाटील यांच्या पुतळ्यांना अभिवादन करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे दुपारी १२ वाजता पनवेलच्या महात्मा फुले महाविद्यालयाच्या एनसीसी कॅडेटच्या विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली. यावेळी नाईक म्हणाले की दि. बा. पाटील हे केवळ प्रकल्पग्रस्तांचे नव्हे तर देशाचे नेते होते.


**वसई–विरार शहर महानगरपालिका**

**प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)**

**मुख्य कार्यालय विरार**

**दुरध्वनी क्र. १२२५०-२४०२१७९/२४०२५३६३**

**जाहिर नोटीस**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | गास-५ | GS०५/३२१४/२० | ६२१ | फिरोज अहमद सिध्दीकी | परवीन मो. रियाज अन्सारी/अन्सारी मो. रियाज |
| २. | गास-५ | ३२१४/३२ | ६२३ | फिरोज अहमद सिध्दीकी | अन्सारी नफिसा बानो निजामुलहक |
| ३. | गास-५ | GS०५/३१६५/१३ | ६२५ | नुरबानो शाहीद खान | वहीदा अमिन शेख/ दानीश मो. अमिन शेख |
| ४. | गास-५ | GS०५/३१३२/३४ | ६२७ | विशाल वा.कांचन/साहील वा. कांचन | अभिषेक काशिनाथ रिकामे/आखी अभिषेक रिकामे |
| ५. | गास-५ | GS०५/३०१७/१८ | ६२९ | गुलाम शब्बीर शेख व हुसना बानो शेख | नजमा बेगम मो. रफिक शेख |
| ६. | गास-१ | GS०१/४८० | ६३१ | ऑस्कर अंतोन फिगेर | हिल्डा ऑस्कर फिगेर |
| ७. | गास-५ | GS०५/३२२९/२ | ६३३ | मो. मुस्तकिम शेख | शाहरुख तौफिक खान |
| ८. | गास-५ | GS०५/२४८९ | ६३५ | अल्ताफ वाय मेमन | झोहराबी इस्माईल खतीब |
| ९. | गास-५ | GS०५/३०२५/२० | ६३७ | आसिया युनुस शेख | नदीम हाशीम बेग |
| १०. | गास-५ | GS०५/३०२५/२१ | ६३९ | अल हसनैन कंन्स्ट्रक्शन | नदीम हाशीम बेग |
| ११. | गास-५ | GS०५/१७०७/१ | ६४१ | नासीर जमीर शेख | मो. अलताफ मो. इस्माईल सय्यद |
| १२. | गास-५ | GS०५/३०२२/२९ | ६४३ | अनवर निजामुद्दीन शवी | समीर सत्तार शेख व तब्बसुम समीर शेख |
| १३. | गास-५ | GS०५/५४३ | ६४५ | अकिला यासीन शेरखान | सलमा नियाज अहमद शेख |
| १४. | गास-५ | GS०५/३१३३/६ | ६४७ | खतीजा सलीम खान व सलीम अब्दुल अजीज | शेख नसीम हफीज |
| १५. | गास-५ | GS०५/४६४ | ६४९ | शबनम शेख | शेख परवीन जैनुल अबेदीन |
| १६. | गास-५ | GS०५/२४९५/१ | ६५१ | नईमा अयुब खान | मोहम्मद रफी आलम हरुन शेख |
| १७. | गास-१ | GS०१/४०२/१ | ६५३ | फ्लावियन जॉकी पिरेल | दोरोथी फ्लावियन पिरेल |
| १८. | गास-१ | GS०१/३७२/२ | ६५५ | फ्लावियन जॉकी पिरेल | दोरोथी फ्लावियन पिरेल |
| १९. | गास-१ | GS०१/२२८/२ | ६५७ | फ्लावियन जॉकी पिरेल | दोरोथी फ्लावियन पिरेल |
| २०. | गास-५ | GS०५/२८५० | ६६१ | साई दर्शन कन्स्ट्रक्शन | रफिक मेहमुद खान |

जावक क्र.:-व.वि.श.म./क.वि./१६२/२०२४-२५
दिनांक: २०-०१-२०२५

(अश्विनी मोरे)
सहाय्यक आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा



**महाराष्ट्र शासन**

**इलाखा शहर विभाग, (सा.बां.)**

**ई -निविदा सुचना क्र. ६३ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट येथील जुने जकात घर मुंबई डी. डी इमारत २ मजल्यावरील कार्यालय, एनएसईएल कॅबिन, डेप्युटी कलेक्टर व कॉम्पेटंट अधिकारी, प्रसाधनगृह, सॅनिटरी फिटींग, दरवाजे, खिडक्या, फॉल्स सिलिंग इ. प्लास्टर, फ्लोरींग, पार्टीशन, नुतनीकरण व दुरूस्ती करणे. | ३०.८१ |
| २ | इंस्टीट्युट ऑफ सायन्स इमारत मुंबई येथील दरवाजे, खिडक्या, सुतार मटेरीअल, सॅनिटरी, पाणी पुरवठा फिटींग, प्लंबींग मटेरीअल इ. रंगकाम, प्लास्टर, दुरूस्ती व वार्षिक देखभाल करणे. | १४.७६ |
| ३ | नविन विधानभवन हॉल मुंबई येथील डोम व टॉवर इमारत येथे विविध दुरुस्तीची कामे करणे. | ४१.३८ |
| ४ | एल टी मार्ग मुंबई येथील सीपी ऑफिस आवारातील ॲडमिन इमारत तळमजल्यावरील कॅश सेक्शन कॅबिनची दुरूस्ती करणे. | १६.७८ |
| ५ | एन. डी. रोड मुंबई येथील रॉकी हिल टॉवर फ्लॅट नं. १२०२ येथील क्रॉकरी युनीट, शु रॅक, दरवाजा, शटर, टेबल, रंगकाम, प्लास्टर, दुरुस्ती करणे. | १२.४८ |
| ६ | आकाशवाणी आमदार निवास मुंबई येथील अंतर्गत वॉटर टॅंकर १ व २ नुतनीकरण करणे. | १८.३० |
| ७ | नविन विधानभवन हॉल मुंबई येथील डोम इमारत तळ ते ५ मजला येथे आणि कंपाऊंड वॉल येथे विविध कामे करणे. | १०.९६ |
| ८ | एल्फिस्टन कॉलेज मुंबई ३ मजल्यावरील क्लासरुम/ प्रयोगशाळेचे नुतनीकरण करणे. | १२.६४ |
| ९ | एल्फिस्टन टेक्नीकल कॉलेज मुंबई येथील नविन पॉलीटेक्नीक इमारत येथील समोरील बाजूस अंतर्गत रंगकाम, प्लास्टर, दुरुस्ती करणे. | १९.५२ |
| १० | शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट येथील जुने जकात घर मुंबई डी. डी इमारत तळमजल्यावरील प्लास्टर, फ्लोरींग, पार्टीशन, प्रसाधनगृह, सॅनिटरी, दरवाजे, खिडक्या इ. मॅजिस्ट्रेट शाखा व स्टाफ ऑफिस नुतनीकरण व दुरुस्ती करणे. | २४.९७ |
| ११ | मुंबई येथील विविध लिफ्ट व जिना लॉबी दुरुस्ती व नुतनीकरण करणे. ( २ मजला ते ३ मजला) | १९.१७ |
| १२ | शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट येथील जुने जकात घर मुंबई डी. डी इमारत तळमजल्यावरील प्लास्टर, रंगकाम, पार्टीशन, सिटींग अरेंजमेंट प्रिशिसज लॅबोरेटरी नुतनीकरण व दुरुस्ती करणे. | ३६.५७ |
| १३ | नविन विधानभवन हॉल मुंबई येथील तळ मजल्यावरील अपोजिशन लिडर चेंबर येथील महिला प्रसाधनगृह नुतनीकरण करणे. | ९.३२ |
| १४ | आकाशवाणी आमदार निवास मुंबई येथील रुम नं. ४१६ नुतनीकरण करणे. | १८.१७ |
| १५ | एल्फिस्टन कॉलेज मुंबई येथील आर्चिव डिपार्टमेंट येथे पॅन्ट्री एरीया, रुम, कॉम्पॅक्टर नुतनीकरण व दुरुस्ती करणे. | ३८.०४ |
| १६ | वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबई येथील ३ मजल्यावरील मेकर टॉवर ई- विंग महाराष्ट्र ॲडमिनिस्ट्रेटिव ट्रिब्नल मुंबई येथील नुतनीकरण व दुरुस्ती करणे. | १९.९१ |
| १७ | महापालिका मार्ग, एल्फिस्टन टेक्नीकल कॉलेज मुंबई येथील मुख्य इमारत येथील दुरुस्ती व वार्षिक देखभाल करणे. | १७.३४ |
| १८ | चर्चगेट सी रोड येथील मातोश्री मुलांचे वसतीगृह येथे कॅन्टीन, प्रसाधनगृह, फ्लोरींग, प्लास्टर, सी आय पाईपलाईन, नुतनीकरण व दुरुस्ती करणे. | २०.६० |
| १९ | एन. डी. रोड मुंबई येथील रॉकी हिल टॉवर फ्लॅट नं. ८०१ येथे अंतर्गत प्लास्टर, किचन ओटा, ट्रॉली, स्टोरेज युनिट रंगकाम, प्लास्टर, दुरुस्ती करणे. | ९.०७ |
| २० | नविन विधानभवन हॉल मुंबई येथील महिला व पुरुष वीआयपी प्रसाधगृह, पॅसेज नुतनीकरण व दुरुस्ती करणे. | २०.६७ |
| २१ | उच्च न्यायालय मुंबई येथील पीडब्ल्युडी मुख्य व विस्तार इमारत येथील जी. आय. पाईपलाईन, वॉटरप्रुफिंग, सिरामिक टाईल्स येथे प्लास्टर, दुरुस्ती करणे. | १६.६९ |
| २२ | जुने जकात घर मुंबई येथील तळमजल्यावरील कॉफरन्स हॉल, चेंबर, कार्यालय, कोकण कमिशनर, सिव्हील डिफेंस नुतनीकरण व दुरुस्ती करणे. | १२.५४ |
| २३ | जुने जकात घर मुंबई येथील मुख्य इमारत कोर्ट नं. १०,५८,३७ येथे बॅरेक पार्टीशन दुरुस्ती करणे. | १९.९८ |
| २४ | उच्च न्यायालय मुंबई येथील पीडब्ल्युडी मुख्य इमारत येथील पॅसेज, कार्यालय, फर्निचर, रंगकाम व प्लास्टर करणे. (कोर्ट नं. ६,१०,३४,२७ व चेंबर नं. ६,१२,६३,६२) | १६.८१ |
| २५ | चर्चगेट सी रोड मुंबई येथील मुलांचे वसतीगृह येथे दुरुस्ती व वार्षिक देखभाल करणे. | १२.१६ |
| २६ | नविन विधानभवन हॉल मुंबई येथील तळमजल्यावरील दरवाजे, पॅनलिंग, पार्टीशन, सिलिंग नुतनीकरण व दुरुस्ती करणे. | ६५.५२ |
| २७ | जी. जे. भोसले मार्ग मुंबई येथील सुरुची इमारत फ्लॅट नं. ८ फर्निचर, नुतनीकरण व दुरुस्ती करणे. | १९.८७ |
| २८ | चर्चगेट मुंबई बी रोड येथील सिडन्हम कॉलेज येथे दुरुस्ती व वार्षिक देखभाल करणे. | १२.९७ |
| २९ | एल. टी. मार्ग मुंबई येथील सी पी ऑफिस आवार पश्चिम बाजूस क्राईम लॉकअप इमारत येथे दुरुस्ती करणे. | ४३.७४ |
| ३० | नविन विधानभवन हॉल मुंबई येथील तळमजल्यावरील पुरुष प्रसाधगृह रुम नं. ०३५ नुतनीकरण करणे. | २२.९५ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. १६.१.२०२५ ते दि. ३०.१.२०२५ पर्यंत.
ई-निविदा उघडणे- दि. ३१.१.२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता
निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्रं. इशवि/निलि/ २०३
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : ६/१/२०२५

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/५६८४

# बुलेट ट्रेनमुळे नागरिकरण वाढेल; रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांचा विश्वास, बुलेट ट्रेन कार्यस्थळी रेल्वे मंत्र्यांचा पाहणी दौरा

**मुंबई : मेहुल गायकवाड**

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पातील सर्वात महत्त्वाच्या घणसोली येथील अतिरिक्त मध्यवर्ती बोगद्यास्थळी रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांनी शनिवारी भेट दिली. यावेळी वैष्णव यांनी कामाबाबत समाधान व्यक्त केले, बुलेट ट्रेनच्या ३४० किमीचे काम प्रगतीपथावर आहे. भविष्यात बुलेट ट्रेनमुळे नागरिकरण वाढेल, असा विश्वास वैष्णव यांनी व्यक्त केला.

घणसोली येथील प्रकल्पस्थळाची पाहणी केल्यानंतर बोलताना वैष्णव म्हणाले की, प्रगत तंत्रज्ञान आणि अत्याधुनिक यंत्रणांचा वापर करून कामे केली जात आहेत. बोगद्यात अत्याधुनिक वायुवीजन आणि प्रकाश व्यवस्थेसह पर्यावरण संरक्षणासाठी उपाययोजनांचा समावेश आहे. तसेच प्रकल्पाच्या ३४० किमीच्या बांधकामात लक्षणीय प्रगती झाली आहे. यासह नद्यांवर पूल बांधणे आणि स्थानकांच्या पायाभूत सुविधांचा विकास यांचा समावेश आहे. वांद्रे-कुर्ला संकुल स्थानकात अभियांत्रिकी चमत्कार म्हणून गौरवले जात आहे. त्याच्या अद्वितीय रचनेमध्ये १० भूमिगत मजले आणि जमिनीच्या वर सात मजले आहेत. त्यांनी पुढे सांगितले की, जपानी तज्ञ कामाचे बारकाईने निरीक्षण करून मान्यता देत आहेत. प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यावर बोगद्यातून अप आणि डाऊन मार्गावरून एकाच वेळी बुलेट ट्रेन ताशी २५० किमी वेगाने धावू शकेल. तर, केवळ एकेरी मार्गावर बुलेट ट्रेन जास्तीत जास्त ताशी ३२० किमी धावू शकेल, असे वैष्णव यांनी सांगितले.

रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांनी बुलेट ट्रेनच्या घणसोली येथील बोगद्याची माहिती दिली. तसेच बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे होणाऱ्या फायद्यांची माहिती दिली. त्यानंतर पत्रकारांनी बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम कसे पूर्ण होणार, प्रकल्पाची अंतिम मुदत काय आहे, असे प्रश्न विचारल्यावर वैष्णव यांनी मौन बाळगले. पत्रकारांच्या प्रश्नांवर उत्तर न देता रेल्वेमंत्र्यांनी तेथून काढता पाय घेतला.



मुंबई – अहमदाबाद बुलेट ट्रेन ५०८ किमी लांबीचे असून यामध्ये वांद्रे-कुर्ला संकुल ते शीळफाटा दरम्यान २१ किमी लांबीच्या बोगदा उभारण्यात येणार आहे. २१ किमी लांबीच्या बोगद्यापैकी ठाणे खाडीतील ७ किमी लांबीचा देशातील पहिला समुद्राखालील बोगदा ठरणार आहे. यासह सुरुवातीचे वांद्रे -कुर्ला संकुल हे स्थानक भूमिगत स्वरूपात बांधले जाणार आहे. वांद्रे-कुर्ला संकुल ते शीळफाट्यापर्यंत २१ किमी लांबीचा बोगदा खोदण्यासाठी टनेल बोअरिंग यंत्र (टीबीएम) आणि न्यू ऑस्ट्रीयन टनेलिंग पद्धतीचा वापर करण्यात येत आहे. हे काम करण्यासाठी घणसोली येथील ३९४ मीटर लांबीचा अतिरिक्त मध्यवर्ती बोगदा महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. आतापर्यंत १,१११ मीटर लांबीच्या बोगद्याचे काम पूर्ण झाले आहे. तर, शीळफाटा येथे एकूण १,६२८ मीटरपैकी ६०२ मीटर बोगद्याचे काम न्यू ऑस्ट्रीयन टनेलिंग पद्धतीने केले आहे.

वांद्रे-कुर्ला संकुल ते शिळफाट्यापर्यंत २१ किमी लांबीचा बोगदा खोदण्यासाठी टनेल बोअरिंग यंत्र (टीबीएम) आणि न्यू ऑस्ट्रीयन टनेलिंग पद्धत अशा दोन्ही पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. बोगद्याच्या १६ किमी भागासाठी तीन टनेल बोअरिंग यंत्रांचा वापर केला जाणार असून उर्वरित ५ किमीच्या भागासाठी न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

## पाच वर्षात वसई, भाईंदर मध्ये दिड हजार जणांच्या आत्महत्या; २०२४ मध्ये गळाफास घेऊन सर्वाधिक आत्महत्या

**वसई : सुचिता देशमुख**

विविध कारणांमुळे आत्महत्या करण्याच्या प्रमाणात सातत्याने वाढ होत आहे.२०२४ या वर्षात मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील तब्बल ४४० जणांनी आत्महत्या केल्या. सर्वाधिक आत्महत्या या गळफास घेऊन करण्यात आल्या आहेत. मागील ५ वर्षात दिड हजार लोकांनी आपले जीवन संपवले आहे.

विविध कारणांमुळे आत्महत्या करण्याच्या प्रमाण वाढत आहे. त्यात कौटुंबिक कलह, प्रेमभंग, आजारपण, परिक्षेतील अपयश तसेच क्षुल्लक कारणामुळे आत्महत्या केल्या




जातात. २०२४ या वर्षात तब्बल ४४० जणांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यात सर्वाधिक म्हणजे ३६४ जणांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्या आहेत. महिन्याला सरासरी ३५ जणांनी आत्महत्या केल्या आहेत. मे महिन्यात ४०, जून मध्ये ४२ तर नोव्हेंबर महिन्यात ४६ जणांनी आत्महत्या केल्या आहेत. गळफास घेऊन आत्महत्या करण्याकडे लोकांना अधिक कल आहे. एकूण आत्महत्यांपैकील ३६४ जणांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्या आहेत. परिक्षेचा तणाव, मिळालेले कमी गुण तसेच अनुत्तीर्ण झाल्याने शालेय विद्यार्थ्यांचे आत्महत्या करण्याचे प्रमाण वाढले आहे.

## पिंपरीतील ४३ मालमत्तांचा लिलाव, मालमत्तांचे मूल्य २२१ कोटी रुपये; काय आहे कारण?

**पिंपरी-चिंचवड : शकिल शेख**

महापालिकेने एक लाखापुढील थकबाकीदारांच्या निवासी आणि बिगर निवासी अशा जप्त केलेल्या ४३ मालमत्तांच्या लिलावाची प्रक्रिया सुरू केली आहे. यामध्ये प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक, सराफा व्यापाऱ्यांच्या मालमत्तांचा समावेश आहे. चालू बाजारभावानुसार या मालमत्तांची किंमत २२१ कोटी ५३ लाख चार हजार ६०३ रुपये आहे. लिलावात सहभागी होण्यासाठी इच्छुकांना ३० जानेवारी २०२५ पर्यंत अर्ज करता येणार आहेत. तर, ३१ जानेवारी रोजी या मालमत्तांचा लिलाव होणार आहे. वारंवार आवाहन करूनही कर भरण्यास टाळाटाळ करणाऱ्या थकबाकीदारांच्या मालमत्ता कर संकलन कार्यालयाने लाखबंद (सील) करून जप्त केल्या आहेत. त्यानंतरही मालमत्ताधारकांकडून प्रतिसाद मिळत नसल्याने महापालिकेने त्या मालमत्तांचा लिलाव जाहीर केला आहे. ४३ मालमत्तांची यादी प्रसिद्ध केली. त्यात २३ निवासी व २० बिगरनिवासी मालमत्ता



आहेत. मालमत्ताधारकांकडे एक लाख ते आठ लाखांपर्यंतची थकबाकी आहे. त्यात प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक, संस्था, व्यक्ती यांच्या निगडी, आकुर्डी, चिंचवड, वाल्हेकरवाडी, पिंपरी भाजी मंडई, मोरवाडी, दापोडी, कासारवाडी, चोविसावाडी, चऱ्होली, वडमुखवाडी, संतनगर, मोशी, किवळे, मामुर्डी, रावेत, दिघी, बोपखेल, वाकड येथील मालमत्ता आहेत. महापालिकेने ४३ मालमत्तांचे लिलाव मूल्य जाहीर केले आहे. निवासी, बिगरनिवासी मालमत्तांचे मूल्य एक कोटीपर्यंत आहे. लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होणाऱ्या इच्छुकांनी महापालिकेच्या करसंकलन विभाग, मुख्य कार्यालयात ३० जानेवारी दुपारी तीन वाजेपर्यंत आधारकार्ड, पॅन कार्ड यांच्या प्रतींसह लेखी अर्जाद्वारे नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. ज्या मालमत्तेबाबत बोली लावायची असल्यास त्या मालमत्तेच्या मूल्यांकनानुसार एक टक्का बयाना रक्कम डिमांड ड्राफ्ट (डीडी) स्वरूपात ३० जानेवारीपर्यंत जमा करणे आवश्यक आहे. त्या पावतीशिवाय लिलावात सहभाग घेता येणार नाही.

पान १ वरुन...

### AI टेक्नॉलॉजी चा....

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय टेक्नॉलॉजी चा वापर जगभरात मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे. प्रत्येक गोष्टीत एआयची मदत घेतली जातेय. आषाढीच्या वेळी गर्दी कुठे कशी जाऊ शकते? त्या ठिकाणी ते किती वेळ थांबतील? याचा अंदाज एआयच्या मदतीने बांधला जाऊ शकतो. सध्या लाखोंच्या गर्दीवर लक्ष ठेवण्यासाठी फक्त ड्रोनचा वापर केला जातो. याद्वारे गर्दी व्यवस्थापन केले जातं. काही सामाजिक सेवाभावी संस्थांचे स्वयंसेवक रस्त्यावर उतरुन गर्दी व्यवस्थापन करत असतात. पण आता एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने गर्दी मोजणे, व्यवस्थापन करणे सोपे होणार आहे. एआय तंत्रज्ञानासाठी नुकताच शासनाकडे दोन कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्याला मंजुरी मिळाल्यानंतर AI तंत्रज्ञानावर काम सुरू होईल. जर ही प्रक्रिया लवकर झाली तर आषाढी वारीत गर्दी नियंत्रणासाठी एआय पद्धत वापरली जाऊ शकणार आहे.

### माझा मुलगा निर्दोष!...

आता ज्यांनी गुन्हे केले आहेत, कोर्टाने आदेश दिल्यानुसार त्यांना सजा मिळणारच हे माझं म्हणणं आहे. माझ्या मुलाने गुन्हा केलाच नाही, माझा मुलगा खरा होता आणि हेच सत्य आहे. आई म्हणून माझा त्याच्यावर विश्वास आहे. माझ्या मुलावर बलात्काराचा आरोप करण्यात आला आणि त्यानंतर त्याचा एन्काऊंटर केला, त्या लोकांनी माझ्या मुलाला मारून टाकलं, असे भावनिक उद्गार त्यांनी काढले. तर कोर्टाच्या निर्णयाबद्दल त्यांनी समाधानही व्यक्त केले आहे.

अक्षय शिंदेच्या एन्काऊंटरप्रकरणी पोलिसांना हा मोठा धक्का आहे. एन्काऊंटर हा बनावट असल्याचे न्यायालयीन समितीने अहवालात स्पष्ट केले आहे. चकमकीदरम्यान त्यावेळी उपस्थित ५ पोलीस कर्मचाऱ्यांनी आपल्या बळाचा गैरपद्धतीने वापर केला आणि एन्काऊंटरचा बनाव रचला. त्यामुळे हे पाच पोलीस कर्मचारी अक्षय शिंदेच्या मृत्यूसाठी जबाबदार आहेत, असेही अहवालात नमूद आहे. याआधारे न्यायालयानेही एन्काऊंटर बनावट असल्याचा निर्णय सुनावला. यावर अक्षयच्या आईने समाधान व्यक्त केले.

### महापालिका पुन्हा प्लास्टिक...

दुकाने, आस्थापना आदी ठिकाणी कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कायद्यानुसार प्लास्टिकचे उत्पादन आणि वापर केल्यास ५ हजार ते २५ हजार रुपये दंड असून तीन महिन्यांच्या कारावासाच्या शिक्षेचीही तरतूद आहे. प्लास्टिकला पर्याय म्हणून विविध पर्यावरणपूरक सामग्रींचा वापर केला जाऊ शकतो. कागदाच्या बॅग्स, बॉक्सेस आणि कंटेनर्स प्लास्टिकच्या जागी वापरता येतात. काचाच्या बाटल्या आणि स्टीलचे कंटेनर्स देखील प्लास्टिकच्या बाटल्यांऐवजी एक चांगला पर्याय असू शकतात. स्टेनलेस स्टील, टायटॅनियम आणि ॲल्युमिनियमच्या वस्तू प्लास्टिकच्या बदल्यात वापरता येतात. बांबूपासून बनवलेल्या वस्तू हा एक पर्यावरणपूरक पर्याय आहे. बांबूपासून ब्रश, कटलरी आणि अन्य वस्तू बनवता येतात. जैविक कापूस, हेम्प आणि जूट यासारख्या पदार्थांपासून वस्त्र तयार केल्या जातात. तसेच कोकोनट शेलपासून बाऊल्स, प्लेट्स आणि अन्य वस्तू बनवता येतात. याशिवाय, बायोडिग्रेडेबल रेजिनसुद्धा प्लास्टिकचे पर्याय म्हणून वापरले जातात. यासारख्या पर्यायी सामग्रींचा वापर केल्याने पर्यावरणावरचा ऱ्हास होणार नाही. आणि प्लास्टिकचा वापर नियंत्रित केला जाऊ शकतो.

### नव्या प्राप्तिकर कायद्यात...

रोखे उलाढाल कर (एसटीटी), भेटवस्तू आणि संपत्ती कर यासंबंधित आहे. यात सुमारे २९८ कलमे आणि २३ प्रकरणे आहेत. आयटी कायदा, १९६१च्या व्यापक पुनरावलोकनासाठी सीतारामन यांनी केलेल्या अर्थसंकल्पीय घोषणेनुसार, केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने (सीबीडीटी) नवीन प्राप्तिकर कायदा संक्षिप्त, स्पष्ट आणि समजण्यास सोपा करण्यासाठी एक अंतर्गत समिती स्थापन केली होती, ज्यामुळे करासंबंधित वाद, खटले कमी होतील आणि करदात्यांना दिलासा मिळेल. कायद्याच्या विविध पैलूंचा आढावा घेण्यासाठी २२ विशेष उपसमित्या स्थापन करण्यात आल्यात.

### नाशिकमध्ये ४०० एकरवर...

जलवाहिनी, विद्युतीकरण, पोलीस चौकी, दवाखाने आदी कामे करण्यात येतील. साधुग्रामसाठी निश्चित जागेतील सुमारे पावणेतीनशे एकर जागा वर्षभरासाठी भाडेतत्त्वावर घेतली जाते. यंदा शेतकऱ्यांना मोबदला देण्यात येऊन जागा अधिग्रहणाचा रखडलेला प्रश्न मार्गी लावला जाणार असल्याचे कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांनी येथे स्पष्ट केले. कुंभमेळ्याचा कालावधी वगळता उर्वरित ११ वर्षे या जागेचा कसा वापर करता येईल, यावर महापालिका विचार करत आहे.

### पंकजा मुंडेंचं वक्तव्य,...

आज मी नागपूरमध्ये आलेली आहे कारण माझ्या खात्याचा पूर्वनियोजित कार्यक्रम होता. त्या कार्यक्रमासाठीच मी नागपूर दौऱ्यावर आहे. असं पंकजा मुंडे यांनी सांगितलं. यानंतर त्यांना पालकमंत्रिपदाबाबत विचारणा करण्यात आली तेव्हा त्यांनी त्याबाबतही भाष्य केलं. 'मला जालन्याचं पालकमंत्रिपद मिळालं आहे. मला चांगला प्रतिसाद मिळतो आहे. मला जी संधी मिळते तेव्हा ती संधी मी अनुभव म्हणून घेत असते. कायमच तुम्हाला एकच काम करायला मिळेल असं होत नाही.

मी पाच वर्षे कुठल्याच संविधानिक पदावर नव्हते तरीही संघटनेचं काम केलं. मला बीडचं पालकमंत्री केलं असतं तर बरं झालं असतं कारण मी बीडची कन्या आहे. बीडकरांनाही याचा आनंद झाला असता. माझा पाच वर्षांचा कार्यकाळ बीडच्या इतिहासातील विकसनशील राहिलेला आहे हे कुणीही मान्य करेल. पण जे निर्णय झाले आहेत त्याबाबत असहमती न दर्शवता जी जबाबदारी मिळाली आहे त्याबाबत चांगलं काम करण्याची भूमिका माझी आहे. अजित पवार हे बीडचे पालकमंत्री म्हणून चांगलं काम करतील याबद्दल मला काहीही शंका नाही. मला जालन्याची जबाबदारी देण्यात आली आहे ती मी पार पाडेन.' असं पंकजा मुंडे म्हणाल्या. धनंजय मुंडेंबाबत विचारलं असता, 'कोण कुणाला काय म्हणालं? यावर मी कसं भाष्य करणार? मी माझ्या भूमिकेबद्दलच बोलू शकते.' असंही पंकजा मुंडे म्हणाल्या.


महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,
समग्र शिक्षा, मुंबई
ई-निविदा सुचना क्र ०७ सन २०२४-२५

कामाचे नाव:- स्टार्स प्रकल्प व PM SHRI टप्पा-२ या योजने अंतर्गत (७६९+३११) एकुण १०८० शाळांमध्ये मंजूर असलेल्या क्रीडांगण विकसन (Development of Play Ground) च्या कामाची ई-निविदा प्रकाशित करण्याबाबत.

राज्य प्रकल्प संचालक, समग्र शिक्षा, मुंबई हे उपरोक्त इमारत बांधकामाकरिता Online निविदा मागवित आहेत.

| | |
|---|---|
| निविदा प्रसिद्धी | १७/०१/२०२५ रोजी सकाळी १०:०० पासून |
| निविदा विक्री व स्विकारण्याचा कालावधी | १७/०१/२०२५ रोजी सकाळी १०:०० पासून ते ०६/०२/२०२५ रोजी सायंकाळी १७:०० पर्यंत |
| निविदापूर्व बैठक | २३/०१/२०२५ रोजी दुपारी १५.०० वाजता |
| तांत्रिक प्रस्ताव (Hard Copy) कार्यालयास जमा करण्याचा कालावधी (Offline). | ०६/०२/२०२५ रोजी सायंकाळी १७:०० पासून ते १०/०२/२०२५ रोजी सायंकाळी १७:०० पर्यंत |
| निविदा उघडण्याचा कालावधी | १०/०२/२०२५ रोजी सायंकाळी १७:३० वाजता (शक्य झाल्यास) |
| संकेतस्थळ व निविदा दस्तावेज प्राप्त करणे | निविदा दस्तावेज www.mahatender.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येतील. शुध्दीपत्रक /स्पष्टीकरण / मुदतवाढ असल्यास वर निर्देशित संकेतस्थळावर टाकण्यात येईल आणि अन्य कोणत्याही माध्यमात प्रकाशित करण्यात येणार नाही. निविदाकार यांनी त्यांच्या वतीने अद्यावत राहण्याकरिता सदर संकेतस्थळाला नियमित भेट द्यावी. |

टिप- निविदा प्रपत्रा मध्ये काही बदल असल्यास सदर बदल केवळ www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

16/1/2025
राज्य प्रकल्प संचालक,
महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,
मुंबई ४०० ००४

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/५७१६



महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे गोरेगाव,(पूर्व),मुंबई -४०००६५.

ई-निविदा सूचना क्रमांक २२ सन २०२४ -२०२५

कार्यकारी अभियता, सा.बा. विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई - ४०० ०६५ योग्य कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता ब -२ नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कोणतेही कारण न देता सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ अंतर्गत मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, परळ येथील ऐतिहासिक इमारतींचे परिरक्षण व दुरुस्ती करणे. | रु.३०,२०,७०,८३९.००/- |

ई - निविदा वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा डाऊनलोड करण्यांचा कालावधी | दिनांक १६/०१/२०२५ रोजी १७.०० पासून दिनांक १०/०२/२०२५ रोजी १५.०० पर्यंत |
| २ | निविदा पुर्व बैठक | दिनांक ०४/०२/२०२४ रोजी १५.०० वाजता मुख्य अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. प्रादेशिक विभाग बांधकाम भवन, मर्झबान पथ फोर्ट मुंबई-४००००१. |
| ३ | निविदा उघडण्याचे ठिकाण दिनांक व वेळ (शक्य झाल्यास) | दिनांक १२/०२/२०२५ सकाळी १५.०० वाजता (शक्य झाल्यास) अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर, प्रशासकीय इमारत रेशनिंग ऑफिस चेंबूर, मुंबई - ४०००७१. |

खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
1. https://mahapwd.com
2. https://mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यांत येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई-४०००६५. कार्यालयातील सुचना फलक.

जा. क्र. साबांविप्र-आरे/नि.लि./ ८८
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई ४०००६५.
दुरध्वनी क्र. ०२२-२९२७२४४७
दिनांक:-

उप कार्यकारी अभियंता
सा. बां. विशेष प्रकल्प विभाग,
आरे, गोरेगाव, पूर्व, मुंबई-४०००६५.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/५७०७


## शिरसाट यांच्या फक्त घोषणाच! सिडको अध्यक्षपदावरील निर्णयांबाबत उलटसुलट चर्चा

**नवी मुंबई : धनश्री सट्टा**

मंत्रीपद आणि 'सिडको' महामंडळाचे अध्यक्ष ही दोन्ही पदे शिवसेनेच्या (शिंदे गट) संजय शिरसाट यांच्याकडे होती. गुरुवारी सरकारने त्यांची 'सिडको' महामंडळाच्या अध्यक्ष पदावरील नियुक्ती संपुष्टात आणली. निवडणूक आचारसंहितेपूर्वी शिरसाट यांची केलेली नेमणूक त्यांनी सिडकोच्या संचालक मंडळात घेतलेल्या तीन निर्णयांमुळे अधिक चर्चेत राहिली. मात्र त्यांनी घेतलेल्या निर्णयांची आजही अंमलबजावणी झाली नसल्याने, या घोषणा निवडणुकीत मते मिळविण्यासाठीच होत्या का, अशी चर्चा सुरू आहे. सिडकोच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्यानंतर नवी मुंबईतील गृहनिर्माण संस्थांच्या प्रतिनिधींनी एकत्र येऊन मागील अनेक वर्षांपासूनचे हस्तांतरण शुल्क सिडकोने माफ करावे, अशी मागणी संजय शिरसाट यांच्याकडे केली. त्यानुसार शिरसाट यांनी या मागणीवर सिडकोच्या संचालक मंडळात चर्चा केली. मात्र याच दरम्यान सिडकोने नवी मुंबईतील जमिनी भाडेपट्टा मालमत्ता भाडेमुक्त (जमीन फ्री होल्ड) करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती अध्यक्ष शिरसाट यांनी प्रसारमाध्यमांना दिली. मात्र त्या निर्णयाद्वारे मोठे शुल्क सिडकोला भरावे लागणार असल्याने सामान्यांचा या निर्णयात कोणताही लाभ झाला नाही. गरजेपोटी घरांचे सर्वेक्षण होऊन प्रकल्पग्रस्तांनी बांधलेल्या बांधकामांना परवानगी मिळण्यासाठीचा दुसरा निर्णय सिडकोकडून घेण्यात आला.




महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
बहुमजली इमारती बांधकाम विभाग,
प्रशासकीय इमारत, पहिला मजला, आर.सी.मार्ग, चेंबूर, मुंबई-४०० ०७१.

| | |
|---|---|
| Email : msbckurla.ee@mahapwd.gov.in | ☎ ०२२-२५२२०२७७ ०२२-२५२२४०६० |
| जा.क्र.काअ/बइबांवि/ ६२ /२०२५ | दिनांक : 15/1/2025 |

ई-निविदा सुचना क्र.१२ सन २०२४-२०२५

कार्यकारी अभियंता, बहुमजली इमारती बांधकाम विभाग, चेंबूर, मुंबई-७१, सक्षम कंत्राटदाराकडून एकूण २ कामांकरीता अंदाजित किंमत रु.८.४० कोटी इतक्या रक्कमेच्या "ईपीसी" नमुन्यातील ई-निविदा मागवीत आहोत. ई-निविदा बाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in पहायला मिळेल. तसेच ई-निविदा दिनांक १७/०१/२०२५ सकाळी १०.३० पासून ते दिनांक ३१/०१/२०२५ रोजी १७.३० पर्यंत या कालावधीत उपरोक्त संकेत स्थळावरुन download करता येईल. सदर कामांची निविदा पूर्व बैठक दिनांक २४/०१/२०२५ रोजी १५.०० वाजता मुख्य अभियंता, प्रादेशिक विभाग, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४००००१ यांचे कार्यालयात घेण्यात येईल. सदर ई-निविदा दिनांक ०३/०२/२०२५ रोजी १२.०० वाजता शक्य झाल्यास अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर, मुंबई-७१ यांचे कार्यालयात उघडण्यात येईल.

तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, बहुमजली इमारती बांधकाम विभाग, चेंबूर, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.gov.in
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदे सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, बहुमजली इमारती बांधकाम विभाग, चेंबूर, मुंबई-७१ कार्यालयातील सुचना फलक.

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/५७८२

(के.र. गुप्ता)
कार्यकारी अभियंता
बहुमजली इमारती बांधकाम विभाग,
चेंबूर, मुंबई-७१.

# अध्यक्षपदाची शपथ घेण्यापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांचं तिसऱ्या महायुद्धाबद्दल मोठं वक्तव्य: केल्या अनेक मोठ्या घोषणा

**■ न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

अमेरिकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प अगदी काही तासात राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेणार आहेत. दरम्यान अमेरिकेचे दुसऱ्यांदा अध्यक्ष बनण्यापूर्वी ट्रम्प यांनी तिसऱ्या जागतिक महायुद्धाबद्दल मोठं भाष्य केलं आहे. तसेच त्यांनी अमेरिकेच्या सीमेवर होत असलेले हल्ले देखील रोखण्याच्या त्यांच्या आश्वासनाचाही पुनरुच्चार केला. त्यामुळे अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर ट्रम्प आपल्या प्रचारात दिलेली आश्वासने पूर्ण करण्यावर भर देणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. ४७वे राष्ट्राध्यक्ष म्हणून शपथ घेण्याच्या काही तास आधी ट्रम्प यांनी वॉशिंग्टन डीसी येथे झालेल्या सभेत त्यांच्या समर्थकांना संबोधित केले. कॅपिटल वन एरिना येथे 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' (ईंईं) विजय रॅलीमध्ये बोलताना ट्रम्प म्हणाले की, 'आम्ही त्यांना सर्वोत्तम पहिला दिवस, सर्वात मोठा पहिला आठवडा आणि अमेरिकेच्या इतिहासातील कोणत्याही राष्ट्राध्यक्षांच्या कारकिर्दीचे पहिले सर्वात असाधारण १०० दिवस देणार आहोत'. इतकेच नाही तर ट्रम्प यांनी जो बायडेन यांचे काही कार्यकारी निर्णय देखील माघारी घेणार असल्याचे जाहीर केले आहे. उद्या सूर्य मावळण्याच्या आधी आपल्या देशाच्या सीमेवर होणारे आक्रमण थांबेल, असे आश्वासन देखील ट्रम्प यांनी यावेळी दिले. सर्व बेकायदेशीर सीमेवर घुसखोरी करणारे, कोणत्या ना कोणत्या स्वरुपात, त्यांच्या घरी परत जातील, असेही ट्रम्प म्हणाले आहेत. ट्रम्प आपल्या हजारो कार्यकर्त्यांसमोर बोलताना म्हणाले की, 'आपण आपल्या मालमत्तेवर पुन्हा दावा करणार आहोत, आम्ही आमच्या अगदी पायाखाली



असलेलं लिक्विड गोल्ड खुलं करणार आहोत'.

ट्रम्प यांनी जोर देऊन सांगितलं की, त्यांचे प्रशासन त्वरित देशाच्या सीमांवर पुन्हा नियंत्रण मिळवेल. त्याबरोबरच आम्ही अमेरिकन इतिहासातील सर्वात मोठी डिपोर्टेशन एक्सरसाइज सुरू करू, असेही ट्रम्प यावेळी म्हणाले. ही मोठी मोहीम असेल ज्याच्या माध्यमातून हजारोंच्या संख्येने अवैध स्थलांतरितांना देशाबाहेर काढले जाईल. यासाठी मोठ्या प्रमाणात पैसा खर्च होणार असून यासाठी अनेक वर्षांचा कालावधी लागू शकतो. 'यापूर्वी, खुल्या सीमा, तुरूंग, मानसिक रूग्णांची काळजी घेणाऱ्या संस्था, महिलांच्या खेळात खेळणारे पुरुष, सर्वांकडून ट्रान्सजेंडर लोकांना मिळणारा पाठिंबा याचा कोणी विचारही करू शकत नव्हते. आम्ही प्रत्येक बेकायदेशीर परदेशी गँग सदस्य आणि अमेरिकेच्या जमिनीवर कार्यरत असलेल्या स्थलांतरित गुन्हेगारांना देशा बाहेर काढू', असेही ट्रम्प म्हणाले.

गाझामधील इस्त्रायल आणि हमास यांच्यातील १ महिन्यापासून सुरू असलेला संघर्ष थांबवण्याचे श्रेय देखल ट्रम्प यांनी घेतले. तसेच त्यांनी दावा केला की, ते राष्ट्राध्यक्ष असते तर युद्ध झालेच नसते. 'आम्ही मध्यपूर्वेतील दीर्घकाळ शांततेच्या दिशेने पहिले पाऊल म्हणून एक महत्त्वाचा युद्धविराम करार करण्यात यशस्वी झालो आहोत. हा करार फक्त नोव्हेंबरमध्ये आम्ही मिळवलेल्या ऐतिहासिक विजयामुळेच शक्य होऊ शकला. पहिल्या ओलीसांची नुकतीच सुटका झाली आहे. बायडेन म्हणाले की त्यांनी हा करार केला. खरंतर मी राष्ट्राध्यक्ष असतो तर हे (गाझा युद्ध) कधी घडलंच नसतं', असेही ट्रम्प म्हणाले.

## मानसिक ताणतणाव, नैराश्यावरील महागडे 'आरटीएमएस' उपचार आता मोफत!

**■ पुणे : अभिजीत येरल्लू**

सध्या मानसिक आजारांचे प्रमाण वाढत आहे. यावर रिपीटेटिव्ह ट्रान्सक्रॅनिअल मॅग्नेटिक स्टिम्युलेशन (आरटीएमएस) ही उपचारपद्धती परिणामकारक ठरते. परंतु, हे उपचार महागडे असल्याने सर्वसामान्य रुग्णांना परवडत नाहीत. आता येरवड्यातील प्रादेशिक मनोरुग्णालयात रुग्णांसाठी ही सुविधा मोफत सुरू झाली आहे. मनोविकारासह उपचाराचा खर्च लाखाच्या घरात जातो. प्रादेशिक मनोरुग्णालयात पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडासह इतर ठिकाणांहून मनोरुग्ण उपचारासाठी येतात. आता त्यांना हे उपचार मोफत मिळणार आहेत. मानसिक आजारांवर उपचार घेणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. हे रुग्ण लवकरात लवकर बरे व्हावेत, यासाठी आरोग्य विभागाने मनोरुग्णालयाला अत्याधुनिक यंत्राची सुविधा



चेतासंस्थेशी निगडित आजारांवर आरटीएमएस उपचार प्रभावी ठरतात. या उपचाराचो अत्याधुनिक यंत्र प्रादेशिक मनोरुग्णालयात बसविण्यात आले आहे. या यंत्राद्वारे मानसिक उपचार शुक्रवारपासून सुरु झाले. हे उपचार बाह्यरुग्ण विभागात उपलब्ध असून, त्यासाठी कोणतीही प्राथमिक शारीरिक चाचणी करण्याची आणि भूल देण्याची आवश्यकता नाही. सर्वसाधारणपणे खासगी रुग्णालयात आरटीएमएस उपचाराच्या एका सत्राचा खर्च ६ ते ८ हजार रुपये असतो. यामुळे एका रुग्णाच्या संपूर्ण उपलब्ध करून दिली आहे. या अद्ययावत यंत्राचे उद्घाटन रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. श्रीनिवास कोलोड यांच्या हस्ते झाले. या उपचाराबद्दल वरिष्ठ मनोविकारतज्ज्ञ डॉ. संदीप महामुनी यांनी सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमास मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रशांत बडगिरे, अधिपरिचारिका संगीता दुबे, रुग्णालयीन अधिकारी, कर्मचारी, तसेच रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन समाजसेवा अधीक्षक रोहिणी भोसले यांनी केले.

## वसई विरार शहरात रिक्षा झाल्या उदंड, बेशिस्त रिक्षाचालकांमुळे वाहतूक कोंडी; प्रवासी नागरिक त्रस्त

**■ वसई : सुचिता देशमुख**

वसई विरार शहरात परवाने खुले होताच रिक्षांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. त्यातच काही रिक्षाचालक हे बेशिस्तपणे रिक्षा चालवित असल्याने विविध ठिकाणी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होऊ लागली आहे. त्याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे.

सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने खासगी प्रवासी वाहतूक करण्यासाठी राज्य परिवहन विभागाकडून ऑटोरिक्षांना मोटार वाहन कायद्यानुसार परवाने दिले जातात. २०१७ पासून ऑटोरिक्षा परवाने खुले करण्यात आले आहेत. परवाने खुले होताच शहरात रिक्षांना अक्षरशः सुळसुळाट झाला आहे. परिवहन विभागाच्या दप्तरी सद्यस्थितीत ३४ हजार ५८२ रिक्षा धारकांना परवाने वितरण करण्यात आले आहेत. सुरवातीला शहरात केवळ ७ ते ८ हजार रिक्षा होत्या. आता रिक्षांची संख्या ही ३९ हजार ५७६ इतकी झाली आहे.

दिवसेंदिवस वाढत असलेल्या रिक्षांचा परिणाम हा शहरात दिसू लागला आहे. त्यातच काही अनधिकृत रिक्षांची भर पडत आहे. वसई, नायगाव, नालासोपारा, विरार अशा ठिकाणी स्थानकासह इतर परिसरात रिक्षांची मोठी गर्दी होऊन वाहतूक कोंडीची समस्या वाढली आहे. त्यातच काही रिक्षाचालक हे बेशिस्तपणे रिक्षा चालवित आहेत. रिक्षा रस्त्याच्या मध्येच अस्ताव्यस्त पद्धतीने उभ्या करतात. तर काहीवेळा प्रवासी घेण्याच्या नादात मध्येच रिक्षा थांबविल्या जातात यामुळे वाहतूक कोंडीची समस्या



निर्माण होत असते. सातत्याने निर्माण होणारी वाहतूक कोंडी, हॉर्नचा त्रास यामुळे वाढती रिक्षांची संख्या ही शहराची डोकेदुखी ठरू लागली आहे. काही वेळा रिक्षा या थांबा सोडून मध्येच उभ्या करतात अशा वेळी रुग्णवाहिका बाहेर पडण्यास अडचणी येत असल्याचे नागरिकांनी सांगितले आहे. वसई विरार शहरात अनधिकृत रिक्षांची संख्या ही वाढत आहे. नुकताच नालासोपाऱ्यात अनधिकृत रिक्षाचालक व परवाना धारक रिक्षा चालक अशा दोन गटात वाद झाला होता. पालिकेने नालासोपारा पूर्वेच्या भागात रिक्षा थांबा तयार केला आहे.

# राज्यातील जिल्ह्यांचे पालकमंत्री जाहीर

**■ मुंबई : सम्यक कासारे**

महाराष्ट्र राज्याचे मंत्री आणि राज्यमंत्री यांची जिल्हा पालकमंत्री तसेच सह पालकमंत्री म्हणून सामान्य प्रशासन विभागाने नियुक्ती केली आहे. यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्रीपद असणार आहे तर ॲड.आशिष जयस्वाल यांच्याकडे सहपालकमंत्रीपद सोपविण्यात आले आहे. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मुंबई शहर आणि ठाणे या दोन जिल्ह्यांचे पालकमंत्रीपद तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पुणे आणि बीड या दोन जिल्ह्यांचे पालकमंत्रीपद देण्यात आले आहे.

**उर्वरित जिल्ह्यांच्या पालकमंत्रीपदाची व सहपालकमंत्री पदाची जबाबदारी पुढीलप्रमाणे :**

नागपूर व अमरावती : चंद्रशेखर बावनकुळे, अहिल्यानगर : राधाकृष्ण विखे-पाटील, वाशीम : हसन मुश्रीफ, सांगली : चंद्रकांत पाटील, नाशिक : गिरीश महाजन, पालघर : गणेश नाईक, जळगाव : गुलाबराव पाटील, यवतमाळ : संजय राठोड, मुंबई उपनगर : ॲड.आशिष शेलार तर सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा, रत्नागिरी : उदय सामंत, धुळे : जयकुमार रावल, जालना : श्रीमती पंकजा मुंडे, नांदेड : अतुल सावे, चंद्रपूर : डॉ.अशोक उईके, सातारा : शंभूराज देसाई, रायगड : कु.आदिती तटकरे, लातूर : शिवेंद्रसिंह भोसले, नंदुरबार : ॲड.माणिकराव कोकाटे, सोलापूर : जयकुमार गोरे, हिंगोली : नरहरी झिरवाळ, भंडारा : संजय सावकारे, छत्रपती संभाजीनगर : संजय शिरसाट, धाराशिव : प्रताप सरनाईक, बुलढाणा : मकरंद जाधव (पाटील), सिंधुदुर्ग : नितेश राणे, अकोला : आकाश फुंडकर, गोंदिया : बाबासाहेब पाटील, कोल्हापूर : प्रकाश आबिटकर तर सहपालकमंत्री श्रीमती माधुरी मिसाळ, वर्धा : डॉ.पंकज भोयर आणि परभणी : श्रीमती मेघना बोर्डीकर

## अखेर युद्धविराम, १५ महिन्यांनंतर गाझामध्ये शांतता नांदणार

**■ इस्त्रायल : वृत्तसंस्था**

इस्त्रायल आणि हमासदरम्यान रविवारपासून युद्धविराम लागू झाल्यामुळे गाझामध्ये तब्बल १५ महिन्यांनंतर शांतता नांदण्याची आशा निर्माण झाली आहे. युद्धविरामाच्या करारानुसार पहिल्या टप्प्यात सहा आठवड्यांच्या कालावधीत युद्ध थांबवले जाईल, तसेच हमासच्या ताब्यातील ओलिसांची आणि इस्त्रायलच्या ताब्यातील पॅलेस्टिनी कैद्यांची सुटका केली जाईल. पूर्वनिर्धारित वेळापत्रकाप्रमाणे स्थानिक वेळेनुसार रविवारी सकाळी ८.३० वाजता करार अंमलात येणार होता. मात्र, हमासने अखेरच्या क्षणी सुटका करावयाच्या तीन ओलिसांची नावे जाहीर न केल्यामुळे कराराची अंमलबजावणी होण्यास तीन तासांचा उशीर झाला आणि काहीशी अनिश्चितता निर्माण झाली. हमासने या ओलिसांची नावे सकाळी ८.३०पूर्वी जाहीर करणे अपेक्षित होते. अखेर दोन तासांच्या विलंबानंतर नावे जाहीर करण्यात आली आणि सकाळी ११.१५ वाजता



करार लागू झाला. या दोन तासांच्या कालावधीत इस्त्रायलने केलेल्या हल्ल्यांमध्ये किमान २६ पॅलेस्टिनींचा मृत्यू झाला असे गाझाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. हमासने ७ ऑक्टोबर २०२३ रोजी केलेल्या हल्ल्यामध्ये जवळपास १,२०० इस्त्रायली नागरिक ठार झाले होते. त्याशिवाय हमासने २५० जणांचे अपहरण करून त्यांना ओलीस ठेवले होते. त्यामध्ये काही परदेशी नागरिकांचाही समावेश होते. त्यापैकी काही ओलिसांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले आहे.

हमासच्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इस्त्रायलने ८ ऑक्टोबरपासून गाझावर हल्ले सुरू केले. त्यामध्ये गाझा शहरासह, राफा, देर अल-बलाह, खान युनिस यासारखी अनेक महत्त्वाची शहरे बेचिराख झाली आहेत.

## पर्यावरण परिणाम मूल्यांकनाशिवाय खारघर-तुर्भे बोगदा; खारघर डोंगररांगावरील निसर्गसंपदेची हानी होण्याची भीती

**■ ठाणे : तृप्ती गोरे**

सिडको महामंडळाने खारघर तुर्भे लिंक रोडसाठी २१०० कोटी रुपये खर्च करुन दुहेरी बोगदा आणि रस्त्याचे काम हाती घेतले आहे. परंतु खारघर डोंगररांगावरील पर्यावरण आणि वन्यजीवांची हानी लक्षात घेणारा 'पर्यावरण परिणाम मूल्यांकनाचा अहवाल' येण्यापूर्वीच हे काम केले




जात असल्याची माहिती मिळाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. माहिती अधिकार कायद्यात महाराष्ट्र किनारपट्टी प्रभाग व्यवस्थापन प्राधिकरणाकडे (एमसीझेडएमए) या प्रकल्पाचा पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन अहवालासाठी पाठपुरावा केल्यावर ही बाब स्पष्ट झाली. त्यामुळे प्रकल्पाला पर्यावरण विभागाच्या परवानगीबाबत साशंकता आहे. खारघरभोवती हजारो हेक्टरवरील विस्तारलेल्या डोंगर रांगांवरील नैसर्गिक साधनसंपत्तीची भुरळ निसर्गप्रेमींना पडल्याने येथे शेकडो जणांनी घरखरेदी केली आहे. खारघर तुर्भे लिंकरोड या प्रकल्पामुळे थेट तळोजा, खारघर आणि पनवेलच्या वाहनचालकांना काही मिनिटांत तुर्भे गाठता येणार आहे.

## साडेपाच महिन्यांत निकाल, समाजाच्या सर्व थरांतून पश्चिम बंगाल सरकारवर सातत्याने दबाव

**■ कोलकाता: वृत्तसंस्था**

आर जी कर रुग्णालयातील बलात्कार व हत्या प्रकरणामुळे देशभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटल्या होत्या. शनिवारी या प्रकरणी संजय रॉयला न्यायालयाने दोषी ठरवल्यानंतर त्याला कठोर शिक्षा देण्याची मागणी केली जात आहे. विशेषतः पश्चिम बंगालमधील निवासी डॉक्टर, वरिष्ठ डॉक्टर, नागरी संघटना, सामाजिक कार्यकर्ते, सामान्य नागरिक अशा सर्व थरांमधून आंदोलने केली गेली होती. काही वर्षांपूर्वी दिल्लीतील 'निभया' प्रकरणाच्या धर्तीवर कोलकात्यामधील तरुणीचा 'अभया' असा उल्लेख करण्यात आला.

या घटनेच्या निषेधार्थ देशात विविध ठिकाणी निदर्शने करण्यात आली. पश्चिम बंगालमधील सरकारी रुग्णालयांमधील निवासी डॉक्टरांनी



अनेक दिवस संप केला होता. पीडितेला न्याय मिळावा आणि सरकारी रुग्णालयांमधील सुरक्षेत वाढ करावी या त्यांच्या प्रमुख मागण्या होत्या. निदर्शकांची मागणी मान्य करून खटला जलदगती न्यायालयात चालवण्यात आला. त्यानुसार, खटला उभा राहिल्यानंतर साधारण दोन महिन्यांनंतर आणि गुन्हा घडल्यानंतर १६२ दिवसांनी या प्रकरणाचा निकाल देण्यात आला.

दरम्यान, संजय रॉयला फाशीची शिक्षा दिली जावी अशी मागणी तृणमूल काँग्रेसचे नेते सौगत रॉय यांनी केली. भाजपचे नेते सुवेंदू अधिकारी यांनीही या निकालाचे स्वागत केले. त्याचवेळी या प्रकरणातील 'व्यापक कटा'चा छडा लावावा अशीही त्यांनी मागणी केली. निकालाच्या दिवशी न्यायालय परिसरात मोठी गर्दी झाली होती. रॉयविरोधात घोषणा दिल्या जात होत्या आणि त्याला फाशीची शिक्षा दिली जावी अशी मागणी केली जात होती. दुसरीकडे, या प्रकरणी सातत्यपूर्ण आंदोलन करणाऱ्या निवासी डॉक्टरांनीही सर्व दोषींना अटक करून शिक्षा होत नाही तोपर्यंत निदर्शने सुरू ठेवणार असल्याचा इशारा दिला. दरम्यान या निकालाला आव्हान देणार नसल्याचे आरोपी संजय रॉयच्या बहिणीने माध्यमांना सांगितले. ती म्हणाली की, "आम्ही या प्रकारामुळे हादरून गेलो आहोत. जर त्याने काही गुन्हा केला असेल तर त्याला योग्य शिक्षा मिळायला हवी.

**महाराष्ट्र शासन**

इलाखा शहर विभाग, (सा.बां.)

**ई -निविदा सुचना क्र. ६६ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६१७५ /२२०१६१७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | जे.बी. मार्ग रस्त्यालगत असलेल्या शासकीय इमारत सुरुची सदनिका क्र. ९ येथे वॉल पॅनेलिंगचे नुतनीकरण व सिमेंट गिलावा, रंगकाम, पॉलिश काम करणे. | २४.१५ |
| २ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे विस्तार इमारतीमध्ये सहाव्या मजल्यावरील रुम क्र. ६२७ येथे नुतनीकरण करणे | ३५.२१ |
| ३ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे मुख्य इमारतीमध्ये चौथ्यामजल्यावरील रुम क्र. ४०२ येथे कार्यालयाचे नुतनीकरण करणे. | ३७.७६ |
| ४ | जे.बी. मार्ग रस्त्यालगत असलेल्या शासकीय इमारत सुरुची सदनिका क्र. १५ येथे वॉल पॅनेलिंगचे नुतनीकरण व सिमेंट गिलावा, रंगकाम, पॉलिश काम करणे. | ५०.८५ |
| ५ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे विस्तार इमारतीमध्ये सहाव्या मजल्यावरील रुम क्र. ६०१,६०२,६०४ येथे नुतनीकरण करणे. | ३२.१३ |
| ६ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे मुख्य इमारतीमध्ये चौथ्यामजल्यावरील रुम क्र. ४०३ येथे कार्यालयाचे नुतनीकरण करणे. | ३९.०७ |
| ७ | जे.बी. मार्ग रस्त्यालगत असलेल्या शासकीय इमारत सुरुची सदनिका क्र. १८ येथे वॉल पॅनेलिंगचे नुतनीकरण व सिमेंट गिलावा, रंगकाम, पॉलिश काम करणे. | १८.९० |
| ८ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे विस्तार इमारतीमध्ये सहाव्या मजल्यावरील रुम क्र. ६०५,६०६,६०७ येथे नुतनीकरण करणे. | ३८.५८ |
| ९ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे मुख्य इमारतीमध्ये पाचव्या मजल्यावरील रुम क्र. ५०१ येथे कार्यालयाचे नुतनीकरण करणे. | ३८.३७ |
| १० | शासकीय इमारत अंबर सदनिका क्र. ३२ येथे जमिनीवरील फरशांची दुरुस्ती करणे, अंतर्गत सिमेंट गिलावा करणे, प्रसाधनगृहाची दुरुस्ती करणे, खिडक्यांची व दरवाजांची दुरुस्ती करणे, डेकोरेटीव रॉड बसविणे, किचन ओट्याची दुरुस्ती करणे, लाकडी कपाटांची दुरुस्ती करणे, रंगकाम करणे, फर्निचरचा पुरवठा करणे तसेच अनुषंगिक कामे करणे इ. स्थापत्य दुरुस्तीची कामे करणे. | ४१.९५ |
| ११ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे विस्तार इमारतीमध्ये सातव्या मजल्यावरील रुम क्र. ७०१ येथे नुतनीकरण करणे. | ३७.७२ |
| १२ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे मुख्य इमारतीमध्ये पाचव्यामजल्यावरील रुम क्र. ५०२ येथे कार्यालयाचे नुतनीकरण करणे. | ३९.२६ |
| १३ | शासकीय इमारत अंबर सदनिका क्र. ३८ येथे जमिनीवरील फरशांची दुरुस्ती करणे, अंतर्गत सिमेंट गिलावा करणे, प्रसाधनगृहाची दुरुस्ती करणे, खिडक्यांची व दरवाजांची दुरुस्ती करणे, डेकोरेटीव रॉड बसविणे, किचन ट्रॉली नव्याने बसविणे, लाकडी कपाटांची दुरुस्ती करणे, रंगकाम करणे, फर्निचरचा पूरवठा करणे तसेच अनुषंगिक कामे करणे इ. स्थापत्य दुरुस्तीची कामे करणे. | ३०.९३ |
| १४ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे विस्तार इमारतीमध्ये सातव्या मजल्यावरील रुम क्र. ७०३,७०४ येथे नुतनीकरण करणे. | ४१.४१ |
| १५ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे मुख्य इमारतीमध्ये पाचव्यामजल्यावरील रुम क्र. ५०३ येथे कार्यालयाचे नुतनीकरण करणे. | ३४.७६ |
| १६ | शासकीय इमारत अवंती सदनिका क्र. ५ येथे जमिनीवरील फरशांची दुरुस्ती करणे, अंतर्गत सिमेंट गिलावा करणे, प्रसाधनगृहाची दुरुस्ती करणे, खिडक्यांची व दरवाजांची दुरुस्ती करणे, डेकोरेटीव रॉड बसविणे, किचन ओट्याची दुरुस्ती करणे, लाकडी कपाटांची दुरुस्ती करणे, रंगकाम करणे, फर्निचरचा पूरवठा करणे तसेच अनुषंगिक कामे करणे इ. स्थापत्य दुरुस्तीची कामे करणे. | ४१.८९ |
| १७ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे विस्तार इमारतीमध्ये सातव्या मजल्यावरील रुम क्र. ७२१ येथे नुतनीकरण करणे. | ३६.४५ |
| १८ | मलबार हिल येथील शासकीय बंगला अग्रदुत मधील अंतर्गत व बाह्य भागाचे दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | ४०.७९ |
| १९ | वैद्यकीय सहाय्यता कक्ष मुख्य इमारतीमध्ये सातव्या मजल्यावरील कार्यालयाचे नुतनीकरण करणे. | ३५.६१ |
| २० | मलबार हिल येथील शासकीय बंगला नंदनवन मधील अंतर्गत व बाह्य भागाचे दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | ४०.३० |
| २१ | मलबार हिल येथील शासकीय बंगला शिवनेरी मधील अंतर्गत व बाह्य भागाचे दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | ५३.७८ |
| २२ | मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयाचे विस्तार इमारतीमध्ये सातव्या मजल्यावरील रुम क्र. ७२३ येथे नुतनीकरण करणे. | ३४.७६ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. १७.१.२०२५ ते दि. ३१.१.२०२५ पर्यंत.
ई-निविदा उघडणे- दि. ३.२.२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता

निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्र. इशवि/निलि/ २९६
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : १३|१|२०२५

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/५७०९

# सातार्‍यात अंधश्रद्धेचा कळस: ऊसाच्या शेतात नेऊन दिला नरबळी

**सातारा : विशेष प्रतिनिधी**

सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यात शुक्रवार १८ जानेवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारा धक्कादायक घटना उघडकीस आली. तालुक्यातील विडनी गावातील माहितीनुसार अंधश्रद्धेमुळे एका महिलेची हत्या करण्यात आली असून या महिलेचा शीर धडापासून वेगळे केलेला मृतदेह आढळून आला आहे. या घटनेमुळे जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. फलटणच्या विडणी गावात ऊसाच्या शेतात महिलेचे शीर धडावेगळे करून शेजारी एका कापडावर हळदी कुंकू, काळी बाहुली आणि महिलेचे केस सापडल्यामुळे परिसरात अघोरी प्रकारातून खून केल्याची चर्चा आहे. दरम्यान विडणी गावातल्या पंचवीस फाटा जवळील ऊसाच्या शेतात खून करून मृतदेह फेकून देण्यात आला आहे. या परिसरातच अज्ञात महिलेचे अवयव वेगवेगळे केलेला मृतदेह आढळून आल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, घटनेनंतर गावातील प्रदीप जाधव यांना याची माहिती मिळाली होती. यानंतर त्यांनी ताबडतोब पोलिसांना घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. यानंतर, फलटण ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळाच्या पंचनाम्याच्या आधारे पुढील तपास सुरू केला आहे. प्रदीप जाधव हे फलटण तालुक्यातील विडाणी येथील २५ फाटा परिसराचे मालक आहेत. निर्मनुष्य ठिकाणी काही दिवसांपूर्वी अज्ञात व्यक्तीने एका महिलेचा खून करून मृतदेह उसाच्या शेतात टाकून फरार झाला असावा अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. संबंधित मृतदेह अर्धवट तसेच सडलेला आहे. हिंस्त्र प्राण्यांनी कबरेपासून सडलेला भाग उसाच्या शेतातून बाहेर ओढून आणला. तेव्हा शुक्रवारी सकाळी हा प्रकार उघडकीस आला. पोलीस पाटील शीतल नेरकर यांनी घटनेची माहिती फलटण ग्रामीण पोलिसांना दिली. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक वैशाली कडूकर, उपविभागीय अधिकारी राहुल धस, पोलीस निरीक्षक सुनील महाडिक, पोलीस उपनिरीक्षक मच्छिंद्र पाटील, शिवाजी जयपात्रे, शिवानी नागवडे यांनी भेट देऊन परिसरातील उसाच्या शेतात पाहणी केली. ज्या ठिकाणी महिलेचा मृतदेह आढळून आला. त्या ऊसाच्या शेतात काही अंतरावर नारळ, गुलाल, महिलेचे केस कापलेले, तेलाचा दिवा, काळी बाहुली, सुरी आढळून आली. त्यामुळे हा प्रकार नरबळी असावा असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाचा सखोल तपास पोलीस करत आहेत.



# २५ लाखांच्या दागिने चोरीचा छडा लावण्यात गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश

**वसई : विशेष प्रतिनिधी**

नालासोपारा पश्चिमेच्या नाळे गावात झालेल्या २५ लाखांच्या दागिन्यांच्या चोरीचा छडा तब्बल ६ महिन्यांनी लावण्यात नालासोपारा पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश आले आहे. या प्रकरणातील ३ आरोपींना भिवंडी, उत्तर प्रदेश आणि दिल्ली येथून अटक केली आहे. या चोरीचा छडा लावणे पोलिसांसाठी मोठे आव्हान बनले होते. नाळे गावातील दिव्येश म्हात्रे यांच्या घरात ८ जुलै २००४ रोजी चोरी झाली होती. अज्ञात चोरांनी घरातील ६२० ग्रॅम वजनाचे सुमारे २५ लाख रुपये किंमतीचे दागिने चोरून नेले होते. गावात झालेल्या या चोरीने बरीच खळबळ उडाली होती. नालासोपारा पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने या प्रकरणी तपास



सुरू केला होता. आरोपी रिक्षातून जात असल्याचे सीसीटीव्हीतून दिसून आले होते. पोलिसांनी सुमारे ८० सीसीटीव्ही कॅमेरे तपासून माग काढला. ही रिक्षा भिवंडी येथे आढळून आली. त्यानंतर पोलिसांनी योगेश गोविंद (३१) याला अटक केली. त्याने रिझवान अन्सारी (३०) आणि मोझम शेख (२९) या दोघांसोबत मिळून चोरी केल्याची कबुली दिली. मात्र दागिने घेऊन रिझवान आणि मोझम उत्तर प्रदेशात गेल्याचे त्याने सांगितले. त्यांनतर पोलिसांनी मोझम शेख याला उत्तर प्रदेशातील बिजनोर जिल्ह्यातून अटक केली. मात्र तिसरा आरोपी रिझवान अन्सारी सर्व दागिने घेऊन फरार झाला होता. दोन आरोपी अटक होऊनही पोलिसांना मुद्देमाल मिळाला नव्हता आणि हे प्रकरण प्रलंबित होतं. रिझवान कुणाच्याही संपर्कात नव्हता. त्यामुळे त्याला पकडणे मोठे आव्हान बनले होते. पोलीस त्याच्या मागावर होते. मात्र त्याने आपली ओळखच लपवली होती. केस, दाढी वाढवून तो गळ्याला मफलर लावून रिक्षा चालवत होता. तांत्रिक विश्लेषण आणि बातमीदारांच्या यंत्रणेला कामाला लावले होते. त्याला पकडण्यासाठी पोलिसांनी रिक्षाचालक बनून सापळा लावला होता. अखेर ६ महिन्यांनी त्याला अटक करण्यात यश आले. त्याच्याकडून चोरी केलेले १५० ग्रॅम वजनाचे ११ लाख २५ हजार रुपये किंमतीचे दागिने हस्तगत करण्यात आले. उर्वरित दागिने त्याने विकले होते. याप्रकरणात दागिने विकत घेणारा सराफ आणि दोन आरोपींच्या बायका देखील सहभागी असून त्यांचा देखील पोलीस शोध घेत आहेत.

GOVERNMENT OF MAHARASHTRA
PUBLIC WORK DEPARTMENT
Executive Engineer, Integrated Unit (P.W.) Division, Fort Mumbai-400 001
Email :- inttegratedmumbai.ee@mahapwd.com
Tel No.022-22016974 Fax No. 022016976.

**RECALL 2ND E-QUOTATION NOTICE No 03/2024-25.**

Sealed and superscripted quotations for Estimate purpose are invited by the Executive Engineer, Integrated Unit (P.W.) Division, Mumbai 01 from Original Manufacturer/Authorized Dealer of Authorized Distributor/ experienced Contractors and Suppliers for **Design, Manufacturing, Supply and Installation, operations and annual maintenance of Stack Parking at Vikhroli New Court Building, Mumbai** to Executive Engineer, Integrated Unit (P.W.) Division, Mumbai 01 as per requirement, so as to reach this office on or before from Date 21/01/2025 to Dt.27/01/2025 upto 2.00 p.m. and will be opened on the Date 28/01/20245 All detail information is available on following websites Visit web site for details : 1. http://mahapwd.com 2. http://mahatenders.gov.in

| Sr.No | Name of Equipment | Particulars Available | Rate |
|---|---|---|---|
| **Name Of Work :- Design, Manufacturing, Supply and Installation, operations and annual maintenance of Stack Parking at Vikhroli New Court Building, Mumbai.** | | | |
| 1 | Design, Manufacturing, Supply and Installation of -2+2 puzzle parking arrangement for Car, Jeep & Innova Crysta Lot No.1 of @ 26 nos. Vehicles and Lot No. 2 of @ 14 Nos. of vehicles<br>Total puzzled parking for @ 40 vehicles customized as per available space and site condition at Vikhroli New Court Building.<br>**Average Rates required per Vehicle for 40 nos. in two lot** | **Lot No. 1**<br>Length @ 5100 mm, Below ground @ 4900 mm Above Ground upto Beam @ 4100 mm Width @19560 mm divided in four bay 2+2+1+2 vehicle width Vehicles to be Park 7x4-2=26 nos.<br>**Lot No. 2**<br>Length @ 5100 mm Below ground @ 4900 Mm Above Ground upto Beam @ 4100 mm Width @12180 mm divided in four bay 1+1+1+1 vehicle widthVehicles to be Park 4x4-2=14 nos.<br>CAD Drawings are available at site | **Average Rates required per Vehicle 40 nos. in two lot** |
| 2 | Operation and maintenance of puzzled parking period for Five years from date of installation .<br>**Average Rate per Vehicle per year** | | **Average Rate per Vehicle per year** |

The Suppliers /Contractors/firms Should ensure that their quotation to submitted on or before the expiry of the date and time. The Suppliers /Contractors/firms should ensure with document i.e GST Certificate, Pan Card and Shop license certificate with following Terms and condition.

1.Validity of this Quotation Notice up to 1 months form the date of opening of quotation.

2.Detailed Specifications size of foundation required and power supply per unit/lot at our scope should be mention in budgetary offer.

3.The rates should be quoted including all taxes but exclusive of GST with free delivery at site.

4.The Hard copy of quotation should also be submitted to this office from 21/01/2025 to 27/01/2025 till 2.00pm.

The right to reject anyone or all quotation without assigning any reason is reserved by the undersigned.

**No. IU/PWD/Mum/Store/ 362 /2024-25**
**Office of the Executive Engineer**
**Integrated Unit (P.W.) Division, Mumbai 01**
**Dated:- 16 /01/2025**

**Executive Engineer**
**Integrated Unit (P.W.) Division,**
**Mumbai 01**

Copy Submitted to the Superintending Engineer, Mumbai P.W. Circle, Mumbai/Thane for information please.

Copy to Asstt. Chief Engineer, Mech. Konkan Region (P.W.) Mumbai, for information please.

Copy Submitted to the Executive Engineer, P.W. North /South/Central, Division, Mumbai for information.

Copy submitted to the Sub-Divisional Engineer, P.W. Sub-Division, No.1 Mumbai/ Hospital Sub-Division, Muimbai for information.

Copy to Notice Board.

**डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/५७८३**

# महिलेवर बलात्कार करुन दोन अल्पवयीन मुलींचा विनयभंग करणाऱ्या मांत्रिकाला अटक

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

गोरेगावमध्ये ४३ वर्षाच्या एका मांत्रिकाला मुंबई पोलिसांनी बलात्कार आणि विनयभंगाच्या आरोपांखाली अटक केली आहे. मुंबईतल्या गोरेगाव भागात एका ३७ वर्षीय महिलेवर या मांत्रिकाने बलात्कार केला. या प्रकरणात या मांत्रिकाला अटक करण्यात आली आहे. सुरुवातीला या मांत्रिकाने तुझ्या नवऱ्याला आजारातून बरं करतो वगैरे सांगून तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर नवऱ्याला आजारातून बरं करण्याच्या बहाण्याने या महिलेवर तीनवेळा बलात्कार केला. तू या गोष्टीची वाच्यता केलीस तर तुझ्या नवऱ्याला काळी जादू करुन मारुन टाकेन असंही या मांत्रिकाने धमकावलं होतं. आता पोलिसांनी या मांत्रिकाला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार राजाराम यादव नावाच्या मांत्रिकाने एका ३७



वर्षाच्या महिलेवर तीनपेक्षा जास्त वेळा बलात्कार केला. तसंच तिच्या दोन अल्पवयीन मुलींचा विनयभंगही केला. या महिलेच्या पतीची प्रकृती जुलै २०२० पासून बिघडली आहे. त्याला बरं करतो, ठणठणीत करतो असं भासवून या राजाराम यादव नावाच्या आरोपीने महिलेवर बलात्कार केला. राजाराम यादव हा स्वतःला मांत्रिक म्हणवतो, तसंच तो रिक्षाही चालवतो. ज्या महिलेवर बलात्कार केला त्या महिलेच्या पतीने त्याला आपल्याला बरं करण्यासाठी जुलै २०२० नंतर घरी बोलवलं होतं. घरी आल्यानंतर त्याने लसूण आणि काही फुलं घेऊन जादूटोणा केला. तुझ्या नवऱ्यावर उपचार करतो आहे असं त्याने या पीडित महिलेला सांगितलं. ही घटना घडल्यानंतर काही आठवडे गेले. या दरम्यान पीडित महिलेला पोटदुखीचा त्रास होऊ लागला. त्यानंतर या राजाराम यादवला गावावरुन पुन्हा मुंबईत बोलवण्यात आलं.

# शेअर ट्रेडिंगच्या नावाखाली बँक अधिकाऱ्याची ११ लाख रुपयांची ऑनलाईन फसवणूक

**ठाणे : विशेष प्रतिनिधी**

शेअर बाजारात ट्रेडिंगच्या नावाखाली बँक अधिकाऱ्याचीच ऑनलाईन ११ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रककरणी कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. फसवणूक झालेली व्यक्ती बँकेत मोठ्या पदावर आहेत. सुमारे महिन्याभरापूर्वी ते शेअर बाजाराबाबत माहिती घेत असताना त्यांच्या मोबाईलवर एका व्हॉट्सअॅप ग्रुपची लिंक प्राप्त झाली. त्यामुळे त्यांनी त्या लिंकवर क्लिक केले असता,




ते व्हॉट्सअॅप समूहामध्ये दाखल झाले. तिथे शेअर बाजारासंदर्भात माहिती दिली जात होती. त्या समूहात एका अॅपची लिंक देण्यात आली होती. त्यानुसार त्या लिंकवर क्लिक करून त्यांनी मोबाईलमध्ये ते अॅप सामाविष्ट केले. त्या अॅपवर त्यांनी थोडक्यात माहिती भरल्यानंतर ते अॅप सुरू झाले. त्या अॅपच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात आले. हे प्रशिक्षण ऐकून त्या बँक अधिकाऱ्याने ११ लाख रुपये अॅपमध्ये देण्यात आलेल्या खात्यात गुंतविले.

# सुश्रुषेसाठी ठेवलेल्या कामगाराकडून मनोरुग्ण महिलेवर बलात्कार

**पुणे : विशेष प्रतिनिधी**

सुश्रुषेसाठी ठेवलेल्या कामगाराकडून मनोरुग्ण महिलेवर बलात्कार करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी भारती विद्यापीठ



पोलिसांकडून कामगाराला अटक करण्यात आली. याबाबत एका पीडित महिलेने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार, सुश्रुषेसाठी ठेवलेल्या ३४ वर्षीय तरुणाला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३८ वर्षीय पीडित महिला मनोरुग्ण आहे. आरोपीला सुश्रृषेसाठी ठेवण्यात आले होते. मनोरुग्ण महिलेला धमकावून त्याने तिच्यावर बलात्कार केला. ३ जानेवारी ते १० जानेवारी दरम्यान त्याने महिलेला धमकावून वेळोवेळी बलात्कार केला. महिला मनोरुग्ण असल्याने सुरुवातीला तिने या घटनेची माहिती दिली नाही. अखेर तिने याबाबतची दिली. त्यानंतर आरोपी तरुणाला अटक करण्यात आली.

# मोबाईल हिसकावणाऱ्या चोरट्याच्या मुसक्या आवळण्यात डेक्कन पोलिसांना यश

**पुणे : विशेष प्रतिनिधी**

रात्रीच्यावेळी कॅबची वाट पाहणाऱ्या तसेच रस्त्याच्या कडेला उभारलेल्या नागरिकांचे अंधाराचा फायदा घेऊन मोबाईल हिसकावणाऱ्या सराईताला डेक्कन पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. त्याच्याकडून चार मोबाईल जप्त केले असून, तीन गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे. हबीब अबालु इराणी (२४) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. त्याच्याकडून डेक्कनमधील दोन व



बाणेरमधील एक असे तीन गुन्हे उघडकीस आले आहेत. ही कारवाई वरिष्ठ निरीक्षक गिरीषा निंबाळकर, गुन्हे निरीक्षक प्रसाद राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक महेश भोसले, अजय भोसले यांच्या पथकाने केली आहे. पुणे शहरात मोबाईल हिसकावणाऱ्या चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. पादचारी, दुचाकीस्वार व वाहनांची वाट पाहत थांबलेल्या नागरिकांकडील मोबाईल हिसकावून नेल्याच्या घटना घडत आहेत. डेक्कन परिसरात देखील दोन घटना घडल्या होत्या. यापार्श्वभूमीवर डेक्कन पोलीस हद्दीत गस्त घालत होते. तेव्हा हबीब इराणी याच्याबाबत माहिती मिळाली. त्यानूसार, पथकाने त्याला सापळा कारवाई करून पकडले.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,**
**प्रशासकीय इमारत, १ ला मजला,**
**भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.**
E-mail-northmumbai.ee@mahapwd.gov.in
**ई -निविदा सुचना क्र. ४५ सन २०२४-२०२५**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २६२३११६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https//mahatenders.gov.in व **www.mahapwd.com** येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) मंडळ, फोर्ट, मुंबई तसेच कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, अंधेरी (प.), मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र | कामाचेनांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | गोरेगाव (पु) मुंबई येथील **१७६ पोलीस निवास्थाने** मधील इमारत क्र. २९ अ ची संरचनात्मक दुरुस्तीची कामे करणे. | रु.७८४४३४५/- |
| २ | गोरेगाव (पु) मुंबई येथील **१७६ पोलीस निवास्थाने** मधील इमारत क्र. २९ ब ची संरचनात्मक दुरुस्तीची कामे करणे. | रु.७९५०६५४/- |
| ३ | गोरेगाव (पु) मुंबई येथील **१७६ पोलीस निवास्थाने** मधील इमारत क्र. २९ क ची संरचनात्मक दुरुस्तीची कामे करणे. | रु.८०७२५६५/- |
| ४ | गोरेगाव (पु) मुंबई येथील **१७६ पोलीस निवास्थाने** मधील इमारत क्र. ३८ ब ची संरचनात्मक दुरुस्तीची कामे करणे. | रु.७५०५०१७/- |
| ५ | गोरेगाव (पु) मुंबई येथील **१७६ पोलीस निवास्थाने** मधील इमारत क्र. ३८ अ ची संरचनात्मक दुरुस्तीची कामे करणे. | रु.७६७४४९७/- |
| ६ | गोरेगाव (पु) मुंबई येथील **१७६ पोलीस निवास्थाने** मधील इमारत क्र. ३८ क ची संरचनात्मक दुरुस्तीची कामे करणे. | रु.७७३८११६/- |
| ७ | गोरेगाव (पु) मुंबई येथील **१७६ पोलीस निवास्थाने** मधील इमारत क्र. ३८ ड ची संरचनात्मक दुरुस्तीची कामे करणे. | रु.७७१७६५६/- |

टिप :- वरिल "ई" निविदा सुचना https//mahatenders.gov.in व **www.mahapwd.com येथे पहावयास तसेच डाऊनलोड करावयास मिळेल. सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास या वेब साईटवर कळविण्यांत येईल.**

ई- निविदा उपलब्ध कालावधी- **दि. १७/०१/२०२५ ते दि. ३१/०१/२०२५ पर्यंत**

ई - निविदा उघडणे - **दि. ०३/०२/२०२५ दुपारी १५.०० वाजता.**

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/ २९३
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८. दिनांक :- 13 JAN 2025

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग,
अंधेरी, मुंबई.

**डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/५७११**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,**
**आरे गोरेगाव,(पूर्व),मुंबई -४०००६५.**
**ई-निविदा सूचना क्रमांक २३ सन २०२४ -२०२५**

कार्यकारी अभियता, सा.बा. विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई - ४०० ०६५ सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत **कंत्राटदार वर्ग ६ व वरील वर्गाचे योग्य कंत्राटदारांकडून अ.क्र.१ व वर्ग ७ व वरील वर्गाचे अ.क्र.२ व वर्ग ५ अ वरील वर्गाचे योग्य कंत्राटदारांकडून अ.क्र.३** खालील ब -१ नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कोणतेही कारण न देता सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | युनिट न.१०, आरे गोरेगाव येथील श्वान पथक केंद्राची दुरुस्ती करणे. (फाल्स सिलिंग करणे व अल्युमिनियम खिडक्या बसविणे.) | रु.१९१४८१८.०० |
| २. | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, अंतर्गत चेना रेंज येथील राखीव वन सर्वे क्र.८९ येथील सीमेवर आर.सी.सी. संरक्षक भिंतींची पुर्नबांधणी करणे. | रु.१३,०९,७८१.०० |
| ३. | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, अंतर्गत येऊर रेंज सर्वे क्र.३८५, बीट ससुनवघर क्र.१११५ नागला परिमंडळ येथील सीमेवर आर.सी.सी. संरक्षक भिंत बांधणे. | रु.४२,०६,१९७.०० |

**ई - निविदा वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी | दिनांक **२०/०१/२०२५** @ १५:०० पासून दिनांक **०३/०२/२०२५** @ १७:०० पर्यंत. |
| २ | निविदा सादर करण्याचा कालावधी | दिनांक **२०/०१/२०२५** @ १५:०० पासून दिनांक **०३/०२/२०२५** @ १७:०० पर्यंत. |
| ३ | निविदा उघडण्याचे ठिकाण दिनांक व वेळ (शक्य झाल्यास) | दिनांक **०५/०२/२०२५** @ १५.०० वाजता (शक्य झाल्यास)<br>कार्यकारी अभियंता, सा.बां.विशेष प्रकल्प विभाग आरे, गोरेगाव ,मुंबई-४०००६५ यांचे कार्यालय |

खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. https://mahapwd.com
२. https://mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यांत येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई-४०००६५. कार्यालयातील सूचना फलक.

जा. क्र. साबांविप्र-आरे/नि.लि./ ९०
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई ४०००६५.
दुरध्वनी क्र. ०२२-२९२७२४४७
दिनांक:-

**उप कार्यकारी अभियंता**
**सा. बां. विशेष प्रकल्प विभाग,**
**आरे, गोरेगाव, पूर्व, मुंबई-४०००६५.**

**डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/५७४९**

# भारताचा पुरूष आणि महिला संघ बनला खो-खो चा पहिला विश्वविजेता

■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

२०२५ खो खो विश्वचषक स्पर्धेचे आयोजन भारतीय खो खो फेडरेशन आणि आंतरराष्ट्रीय खो खो फेडरेशन यांनी नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी मैदानात केले होते. खो-खो विश्वचषकाच्या पहिल्याच सीझनमध्ये एकूण २० पुरुष आणि १९ महिला संघांसह सहा खंडातील २३ देशांचा सहभाग होता. यातून भारताच्या संघाने बाजी मारत वर्ल्डकप ट्रॉफी जिंकली आहे पहिलाच खो-खो विश्वचषक भारतात खेळवला गेला आणि महिला-पुरूष दोन्ही संघांमध्ये भारताच्या संघाने इतिहास घडवला आहे. महिला खो खो संघानंतर पुरूष खो-खो संघानेही नेपाळला नमवत विश्वचषक जिंकला. भारतीय पुरुष संघाची संपूर्ण स्पर्धेत अपराजित होता आणि भारताच्या पुरूष संघाने अंतिम फेरीतही विजय मिळवला. टीम इंडियाने नेपाळविरुद्धचा सामना ५४-३६ अशा फरकाने जिंकला. भारतीय संघ अशारितीने खो खो वर्ल्ड चॅम्पियन ठरला आहे. महिला खो खो संघाने नेपाळचा ७८-४० च्या फरकाने पराभव केला. तर पुरूष संघाने नेपाळचा ५४-३६ च्या फरकाने सामना जिंकला. नेपाळच्या पुरूष संघाने भारताला चांगलीच टक्कर दिली पण अखेरीस




भारताने बाजी मारली. खो-खो विश्वचषक २०२५ पुरुषांच्या अंतिम सामन्यात, भारतीय संघाची नेपाळविरुद्ध चांगली सुरुवात झाली, ज्यामध्ये त्यांनी पहिल्या टर्नमध्येच २६ गुण मिळवले आणि नेपाळ संघाला खाते उघडण्याची संधीही दिली नाही. दुसऱ्या टर्नमध्ये नेपाळ संघाने पुनरागमन करण्याच प्रयत्न केला. ज्यात त्यांनी एकूण १८ गुण मिळवले परंतु टीम इंडियाने ८ गुणांची आघाडी कायम राखली. तिसऱ्या टर्नमध्ये भारतीय पुरुष खो-खो संघाने शानदार पुनरागमन केले, ज्यामध्ये त्यांनी नेपाळला विजेतेपदाच्या सामन्यातून पूर्णपणे बाहेर केले आणि त्यांचे गुण ५० च्या पुढे नेले. भारतीय पुरुष खो-खो संघाने नेपाळविरुद्धच्या अंतिम सामन्यात पहिल्या तीन टर्नमध्ये आपली आघाडी कायम ठेवली होती, तर चौथ्या टर्नमध्येही चांगली कामगिरी करत ५४-३६ अशा फरकाने सामना जिंकला. भारतीय पुरुष खो-खो संघाने या विश्वचषकात दुसऱ्यांदा नेपाळ संघाचा पराभव केला आहे. भारतीय महिला संघाने पहिल्या टर्नमध्ये आक्रमण केले आणि नेपाळच्या बचावपटूंना प्रतिकार करता आला नाही, त्यानंतर भारताने ३४-० अशी सुरुवातीची आघाडी घेतली आणि येथून सामना त्यांच्या ताब्यात आला. प्रियंका इंगळेच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने नेपाळला पुनरागमनाची एकही संधी दिली नाही. दुसऱ्या टर्नमध्ये नेपाळच्या संघावर आक्रमण करण्याची पाळी आली असताना त्यांना आघाडी मिळवता आली नाही. फक्त अंतर कमी करण्यात ते यशस्वी ठरले आहेत. दुसऱ्या टर्ननंतर स्कोअर ३५-२४ असा झाला. चौथ्या टर्नमध्ये भारतीय महिला संघाने नेपाळच्या आक्रमणकर्त्यांना फारसे वर्चस्व गाजवू दिले नाही आणि बचाव करताना जबरदस्त खेळ दाखवला. या बदल्यात भारतीय महिला खेळाडूंनी नेपाळ संघाला सामन्यातून पूर्णपणे बाहेर केले. शेवटी सामना ७८-४० अशा गुणांवर संपला.

## पालक मंत्र्यांच्या नियुक्तीला स्थगिती देण्याच्या निर्णयानंतर वडेट्टीवारांचा प्रश्न, 'जिल्ह्याचं पालकत्व हवं की मलिदा?'

■ मुंबई : गणेश बागडे

महिनाभर रखडलेल्या पालकमंत्र्यांची यादी १८ जानेवारी रोजी रात्री उशिरा जाहीर करण्यात आली. नव्या पालकमंत्र्यांच्या यादीत अनेकांना सहपालकमंत्रीपदही मिळालं आहे. तर, काही जिल्ह्यांमध्ये स्थानिक मंत्र्यांना संधी देण्यात आलेली नाही. तसेच, काही मंत्र्यांना पालकमंत्रिपद मिळालेलं नाही. राज्याचे शालेय शिक्षणमंत्री व शिंदे गटाचे नेते दादा भुसे, रोजगार हमी तथा फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांना पालकमंत्रिपद न मिळाल्यामुळे त्यांच्यावर अन्याय झाल्याची भावना पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी रविवारी (१९ जानेवारी) जळगाव येथे व्यक्त केली होती. तसेच या दोन्ही नेत्यांच्या कार्यकर्त्यांनी संतप्त प्रतिक्रिया दिल्या आहेत.



दरम्यान, या गोंधळात आता नवा ट्विस्ट आला आहे. राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने नाशिक व रायगडच्या पालकमंत्रिपदाच्या नियुक्तीला स्थगिती दिली आहे. १९ जानेवारी रोजी रात्री उशिरा पत्रक जारी करून हा निर्णय घेण्यात आला. आदिती तटकरे यांना रायगडचं तर गिरीश महाजन यांना नाशिकचं पालकमंत्रिपद देण्यात आलं होतं. मात्र, रायगडचं पालकमंत्रिपद मिळावं यासाठी भरत गोगावले तर, नाशिकच्या पालकमंत्रिपदासाठी दादा भुसे आग्रही होते.

दरम्यान, मंत्र्यांची नाराजी आणि पालकमंत्रिपदाच्या नियुक्तीला दिलेल्या स्थगितीच्या वृत्तानंतर काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. वडेट्टीवार म्हणाले, जिल्ह्याच्या विकासासाठी पालकत्व हवे की मलिदा खाण्यासाठी जिल्ह्याची मालकी? प्रचंड बहुमत मिळाल्यानंतरसुद्धा महायुती सरकारची आज ही अवस्था आहे. ५० दिवसांनंतर जिल्ह्याला या सरकारने पालकमंत्री दिले. त्यात ही आता एका रात्रीत पालकमंत्री बदलण्याची नामुष्की सरकारवर आली आहे! आधी मंत्रीमंडळ विस्तार, नंतर खाते वाटप, आता पालकमंत्री जबाबदारी देण्यासाठी विलंब झाला आणि दिलेले पालकमंत्री बदलण्याची वेळ आली, हे फक्त एका कारणासाठीष्ठ. मोठा मलिदा कोणाला मिळणार? जिल्ह्याचा व जनतेचा विकास राहिला दूर, आधी स्वतःचा विकास करण्यासाठी महायुतीत धडपड सुरू आहे. मंत्रिपदावर वर्णी लागल्यानंतर भरत गोगावले यांनी रायगडच्या पालकमंत्रिपदासाठी मोर्चेबांधणी केली होती. जिल्ह्यातील शिवसेना व भाजपा आमदारांनी रायगडचे पालकमंत्री म्हणून फलोत्पादन व रोजगार हमीमंत्री भरत गोगावले यांची निवड करण्याची मागणी केली होती.

## शिवसेना ठाकरे गटाचे १० आमदार कधीही शिंदे गटात येतील, गुलाबराव पाटील यांचा दावा

■ जळगाव: मेहुल गायकवाड

महायुतीचे आम्ही २३७ आमदार एकत्र असून, आमच्यात कोणतेही मतभेद नाहीत. ठाकरे गटातील २० आमदारांमध्येच सध्या बेबनाव आहे. ठाकरे गटाचे १० आमदार कधीही शिंदे गटात येतील. तेव्हा तुम्ही झोपेत असाल, असा दावा शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) पाणी पुरवठा आणि स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी केला आहे.

मंत्रिमंडळ विस्तारानंतर पालकमंत्र्यांच्या नियुक्तीवरून महायुतीतील तीनही पक्षांमध्ये मतभेद असल्याची चर्चा सुरू असतानाच, शिवसेनेचे (उध्दव ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांनी या मुद्द्यावरून महायुतीवर टीका केली आहे. ठाकरे यांच्या टिकेला मंत्री गुलाबराव पाटील यांनी शनिवारी उत्तर दिले.



जळगावमध्ये जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या उद्घाटन कार्यक्रमानंतर गुलाबराव पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधला. आम्ही आता २३७ आमदार आहोत. आमच्यामध्ये कोणतेही मतभेद उरलेले नाहीत. त्यामुळे आम्ही अर्धे इकडे आणि अर्धे तिकडे गेलो तरी काहीच फरक पडणार नाही. ठाकरे गटातील २० आमदारांमध्येच आता मोठे वाद आहेत. आधी त्यांना सांभाळा. विशेषतः भास्कर जाधव यांना आवरा, असा टोला मंत्री पाटील यांनी आदित्य ठाकरे यांना हाणला. जळगावच्या पालकमंत्रीपदासाठी भाजप नेते मंत्री गिरीश महाजन आणि मंत्री संजय सावकारे यांच्याबरोबरच मंत्री गुलाबराव पाटील यांच्याही नावाची चर्चा सुरू आहे. त्याबाबतीत विचारले असता, मंत्री पाटील यांनी त्यांच्या नेहमीच्या शैलीत प्रतिक्रिया दिली.

## राहुल गांधींच्या अडचणीत वाढ, 'त्या' वक्तव्याप्रकरणी गुन्हा दाखल; देशाचे सार्वभौमत्व आणि अखंडता धोक्यात आणल्याचा दावा!

■ नवी दिल्ली : वृत्तसंस्था

भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने देशातील प्रत्येक संस्था आपल्या ताब्यात घेतली आहे. त्यामुळे आता काँग्रेसची लढाई केवळ भाजप आणि संघाशीच नव्हे तर 'इंडियन स्टेट'शीही (भारतीय राज्य यंत्रणा) आहे, असे विधान काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी



काही दिवसांपूर्वी केले होते. त्यांच्या या वक्तव्याचे पडसाद आता उमटू लागले असून यामुळे त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहितेच्या कलम १५२ आणि १९७(१) अंतर्गत गुवाहाटी येथील पान बाजार पोलिस स्टेशनमध्ये हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारताचे सार्वभौमत्व एकता आणि अखंडता धोक्यात आणणाऱ्या कृत्यांसाठी हा गुन्हा दाखल केला जातो. राहुल गांधींच्या वक्तव्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्था आणि राष्ट्रीय सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला असल्याचा आरोप तक्रारकर्त्याने केला आहे. चेतिया यांनी असा दावा केला की गांधींचे शब्द हे राज्याच्या अधिकाराला वैध ठरवण्याचा प्रयत्न होते, ज्यामुळे अशांतता आणि फुटीरतावादी भावना भडकवणारे धोकादायक कथा तयार होतात.

'आपला लढा भारतीय राज्याविरुद्ध असल्याचे घोषित करून राहुल गांधींनी जाणीवपूर्वक विध्वंसक कारवाया आणि लोकांमध्ये बंडखोरी भडकावली आहे. हा राज्याच्या अधिकाराला वैध ठरवण्याचा आणि त्याला एक विरोधी शक्ती म्हणून चित्रित करण्याचा प्रयत्न आहे. एक धोकादायक कथा जे अशांतता आणि फुटीरतावादी भावनांना भडकावू शकते', असं चेतिया यांनी एफआयआरनुसार आपल्या तक्रारींमध्ये म्हटले आहे. 'विरोधी पक्षनेते म्हणून, लोकशाही संस्थांवर जनतेचा विश्वास टिकवून ठेवण्याची जबाबदारी गांधींची आहे. परंतु त्याऐवजी, त्यांनी भारताची एकता आणि सार्वभौमत्व धोक्यात आणून खोटे पसरवण्यासाठी आणि बंडखोरीला चिथावणी देण्यासाठी त्यांच्या व्यासपीठाचा वापर करणे निवडले', असं एफआयआरमध्ये नमूद आहे. 'लोकशाही मार्गाने जनतेचा विश्वास संपादन करण्यात असमर्थ ठरल्याने, आरोपी आता केंद्र सरकार आणि भारतीय राज्याविरुद्ध असंतोष भडकावू पाहत आहेत. विरोधी पक्षनेते म्हणून त्यांची भूमिका पाहता हे वर्तन चिंताजनक आहे.'

## 'महसूल' मधील वाद चव्हाट्यावर; विरार-अलिबाग मार्गिका भूसंपादन अधिकार पुन्हा मेट्रो सेंटरकडे

■ पनवेल : भावना जैन

**राज्य सरकारची तिजोरी रिती झाल्यामुळे विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेचे भूसंपादन ठप्प झाले होते. मात्र आता सरकारकडून भूसंपादनाचा निधी उपलब्ध होत असताना रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी काढलेल्या एका नव्या आदेशामुळे पनवेलमधील १३ गावांचे भूसंपादनाचे अधिकार पनवेल प्रांत अधिकाऱ्यांकडून काढून पुन्हा मेट्रो सेंटरच्या उपजिल्हाधिकाऱ्यांकडे आले. त्यामुळे भूसंपादनाच्या अधिकाराचा वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे निधीची उपलब्धता नसल्याने विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेच्या पहिल्या टप्याचे ९६ किलोमीटर मार्गिकेचे भूसंपादन रखडले होते. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर वित्त विभागाच्या हमीनंतर या मार्गाच्या भूसंपादन आणि बांधकामासाठी निधी उपलब्ध केला जात आहे. पण निधी उपलब्ध होण्यापूर्वी भूसंपादनाचे अधिकार नेमके कोणाकडे असावे यासाठी अधिकाऱ्यांमध्ये 'अधिकार युद्ध' सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी काही दिवसांपूर्वी शासनाला प्रस्ताव पाठविल्यानंतर शासनाने २३ डिसेंबरला या पत्रावर राजपत्र काढून पनवेलमधील १३ गावांच्या भूसंपादनाचे अधिकार पनवेलचे प्रांत अधिकारी पवन चांडक यांच्याकडून काढून भूसंपादनासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्रमांक १ अधिकारी दत्तात्रय नवले यांची नियुक्ती केली. नवले यांनी तातडीने ६



दिवसांमध्ये १३ गावांतील भूसंपादनाचा मोबदला स्विकारण्यासाठी महामार्गातील बाधित शेतकऱ्यांना नोटीस बजावली. भूसंपादनाची रक्कम ठरविण्यासाठी जिल्हास्तरीय समितीने हेक्टरी निर्धारित केलेले दर त्यासोबत १२ टक्के अतिरिक्त व्याजाची रक्कम तसेच १०० टक्के दिलासा रक्कम आणि २५ टक्के संमतीचा वाढीव मोबदल्याची रक्कम तातडीने मिळण्यासाठी यासाठी शेतकरी अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा करत आहेत. ही रक्कम लगेच काढून देण्याचे आश्वासन देणारे बोगस दलाल सध्या पनवेलच्या गावांमधील शेतकऱ्यांना संपर्क साधत आहेत. संबंधित नोटीस मिळाल्यानंतर बाधित शेतकऱ्यांनी येत्या १५ दिवसांत मेट्रो सेंटर कार्यालयाकडे जमा करायचे आहेत. हे पुरावे जमा केल्यावर पुढील महिन्यात या भूसंपादनाची रक्कम मिळेल असे शेतकऱ्यांना वाटत आहे. हे भूसंपादन लवकर व्हावे यासाठी सचिवालयातील काही बड्या अधिकाऱ्यांचे विशेष लक्ष या भूसंपादनावर असल्याचे विश्वसनीय सूत्रांकडून समजते. रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांना याविषयी संपर्क साधला मात्र त्यांनी प्रतिसाद दिला नाही. विरार अलिबाग मार्गिकेच्या भूसंपादनाचे अधिकार कोणाकडे असावे हे ठरविण्यासाठी महसूल विभागाने पनवेल व उरण या तालुक्यातील गावांची विभागणी यापूर्वीच केली होती. मात्र रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जलदगतीने भूसंपादन होण्यासाठी पनवेलमधील १३ गावांचे अधिकार पुन्हा मेट्रो सेंटर क्रमांक एककडे दिल्याने अधिकाऱ्यांमधील भूसंपादनाच्या ३ ते ४ हजार कोटी रुपयांची रक्कम वाटपाचा वाद पनवेलमध्ये चर्चेचा विषय बनला आहे.

## राष्ट्रीय महिला आयोग देशभरात विवाहपूर्व समुपदेशन केंद्र उभारणार

■ मुंबई : विशाल कारंडे

देशात तरुणांमधील घटस्फोटांच्या प्रमाणात मोठी वाढ झाली आहे. ही एक चिंतेची बाब असून त्याचा परिणाम सर्वच क्षेत्रावर होऊ लागला आहे. त्यामुळे तरुणांना मार्गदर्शन करण्यासाठी देशातील प्रमुख शहरात विवाहपूर्व समुपदेशन ('प्री मॅरेज काऊंसिलिंग) केंद्र उभारण्याचा निर्णय राष्ट्रीय महिला आयोगाने घेतला आहे. या केंद्राचे लोकार्पण येत्या ८ मार्च रोजी म्हणजे महिला दिनी केले जाणार आहे. सामाजिक दायित्व निधीच्या मदतीने महिलांचे सशक्तिकरण करण्यासाठी उत्तनच्या राम भाऊ म्हाळगी प्रबोधिनी मध्ये




राष्ट्रीय महिला आयोग व म्हाळगी प्रबोधनी संस्थेच्या संयुक्त विद्यमानाने परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यात देशभरातील प्रमुख खासगी संस्थेच्या प्रतिनिधीनी तसेच सामाजिक संस्थांनी सहभाग घेतला होता.यावेळी सामाजिक दायित्व निधीच्या मदतीने महिलांना सशक्त करण्याच्या हेतूने शिक्षण, संधी आणि आर्थिक सहकार्य देण्यासारख्या प्रमुख बाबींवर मंथन करण्यात आले. यात दायित्व निधीचा वापर कशाप्रकारे होऊ शकतो याबाबतचे मार्गदर्शन आयोगाकडून देण्यात आले. या प्रसंगी बोलत असताना देशात तरुणांमध्ये वाढते घटस्फोटाचे प्रमाण ही एक चिंतेची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.पूर्वीच्या काळी एकत्रित कौटुंबिक व्यवस्थेत राहत असल्याने तरुण मुला-मुलींना सुखी संसार करण्याचे मार्गदर्शन मिळत होते.

मात्र प्रगतीच्या मार्गावर धावत असलेले तरुण आता स्वतंत्र राहण्यास प्राधान्य देत आहेत.परिणामी या तरुण मंडळींना लग्ननंतर बदलणाऱ्या परिस्थितीला हाताळणे व त्यातून मार्ग काढणे कठीण होत आहे. यावर अभ्यास केले असता ही केवळ कौटुंबिक स्तरावरची समस्या नसून त्याचा व्यापक परिणाम इतर गोष्टीवर देखील होऊ लागला आहे.

## राज्यात १९ दिवसांत आठ वाघांचा मृत्यू, शिकारीचा संशय; वन खात्याचे दुर्लक्ष

■ नागपूर/ चंद्रपूर: नितीन देवळेकर

वाघांचा मृत्युदर ५० टक्क्यांनी कमी झाला म्हणून आनंद साजरा करणाऱ्या राज्यात गेल्या १९ दिवसांत आठ वाघांचा



मृत्यू झाला. हे सर्वच मृत्यू संशयास्पद आहेत, पण कोणत्याही अधिकाऱ्याला त्यासाठी जबाबदार धरण्यात आले नाही. त्यामुळे वन खाते खरोखरच वाघांच्या संरक्षण व संवर्धनाविषयी गंभीर आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दरम्यान, बल्लारशा-गोंदिया रेल्वेमार्गावर रविवारी सकाळी रक्सौल एक्स्प्रेसने सिंदेवाही-आलेवाहीजवळ धडक दिल्याने वाघाचा जागीच मृत्यू झाला. चंद्रपूर-बल्लारपूर रेल्वेमार्गावर आजवर ५० पेक्षा अधिक वन्यप्राण्यांचा मृत्यू झाला आहे. राज्यात आतापर्यंत झालेले वाघांचे मृत्यू भविष्यात वाघांना असणारा धोका दर्शवणारे आहे. वाघांचे तीन तुकडे करून जंगलात फेकल्यानंतरही वनाधिकाऱ्यांना माहिती होत नाही. शिकारी वाघाची शिकार करून १२ नखे आणि दात काढून नेतात, पण त्याची साधी कुणकुणही त्यांना लागत नाही.

## मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणात ६४ टक्के पाणी साठा, मुंबईत बहुतांशी ठिकाणी अपुऱ्या पाणीपुरवठ्याच्या तक्रारी

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

**मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही धरणांत सध्या ६४ टक्के पाणी साठा आहे. मात्र गेल्या काही महिन्यांपासून मुंबईतील अनेक भागांमध्ये नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे ही पाणी टंचाई नेमकी कशामुळे निर्माण झाली आहे असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक आणि लोकप्रतिनिधींना पडला आहे.**

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणक्षेत्रात यंदा चांगला पाऊस पडला होता. उर्ध्व वैतरणा, मोडकसागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार आणि तुळशी या सातही धरणांतील पाणीसाठा सुमारे ९५ टक्क्यांवर गेला होता. मात्र तरीही यावर्षी ऑक्टोबर महिन्यापासूनच मुंबईच्या विविध भागात पाणी टंचाई जाणवत आहे. विविध मतदारसंघातील आमदार पाणी प्रश्नासाठी पालिका आयुक्तांची भेट घेत आहेत.

शिवसेनेच्या ठाकरे गटाने ऑक्टोबर महिन्यात शिवडीमध्ये हंडा मोर्चा काढला होता. त्याआधी वरळी, लोअर परळ भागात पाणी टंचाई होती. जानेवारीच्या पहिल्याच आठवड्यात दिंडोशीतील ठाकरे गटाचे आमदार सुनील प्रभू यांनी पालिकेच्या विभाग कार्यालयावर मोर्चा नेला होता. तर गेल्याच आठवड्यात आमदार आदित्य ठाकरे यांनीही पालिका आयुक्त भूषण गगराणी यांची भेट घेतली होती. तसेच मुंबईत अनेक ठिकाणी पाणी कमी दाबाने येते, कधी दूषित पाणी येते तर कधी कमी पाणीपुरवठा होतो अशा तक्रारी असल्याचे त्यांनी यावेळी आयुक्तांना सांगितले. गेल्या काही दिवसांपासून खार, सांताक्रूझ, वांद्रे परिसरातही ट्रॅकरने पाणी आणावे लागत असल्याच्या तक्रारी विभाग कार्यालयात आल्या होत्या. तर दोनच दिवसांपूर्वी जोगेश्वरी पूर्वचे आमदार अनंत नर यांनीही पालिका आयुक्तांची भेट घेऊन पाण्यासंदर्भात निवेदन दिले. जोगेश्वरी पूर्वेकडील बांद्रेकर वाडी, मेघवाडी, शामनगर, आघाडीनगर या भागात प्रचंड पाणी टंचाई असल्याचे त्यांनी यावेळी आयुक्तांना सांगितले. तसेच या भागात पाणीपुरवठा करण्यासाठी असलेल्या वेरावली जलाशयाबरोबरच आणखी एक अतिरिक्त जलाशय बांधावे, अशीही मागणी त्यांनी केली.

शिवसेनेच्या ठाकरे गटाने ऑक्टोबर महिन्यात



शिवडीमध्ये हंडा मोर्चा काढला होता. त्याआधी वरळी, लोअर परळ भागात पाणी टंचाई होती. जानेवारीच्या पहिल्याच आठवड्यात दिंडोशीतील ठाकरे गटाचे आमदार सुनील प्रभू यांनी पालिकेच्या विभाग कार्यालयावर मोर्चा नेला होता. तर गेल्याच आठवड्यात आमदार आदित्य ठाकरे यांनीही पालिका आयुक्त भूषण गगराणी यांची भेट घेतली होती. तसेच मुंबईत अनेक ठिकाणी पाणी कमी दाबाने येते, कधी दूषित पाणी येते तर कधी कमी पाणीपुरवठा होतो अशा तक्रारी असल्याचे त्यांनी यावेळी आयुक्तांना सांगितले. गेल्या काही दिवसांपासून खार, सांताक्रूझ, वांद्रे परिसरातही टॅंकरने पाणी आणावे लागत असल्याच्या तक्रारी विभाग कार्यालयात आल्या होत्या. तर दोनच दिवसांपूर्वी जोगेश्वरी पूर्वचे आमदार अनंत नर यांनीही पालिका आयुक्तांची भेट घेऊन पाण्यासंदर्भात निवेदन दिले. जोगेश्वरी पूर्वेकडील बांद्रेकर वाडी, मेघवाडी, शामनगर, आघाडीनगर या भागात प्रचंड पाणी टंचाई असल्याचे त्यांनी यावेळी आयुक्तांना सांगितले. तसेच या भागात पाणीपुरवठा करण्यासाठी असलेल्या वेरावली जलाशयाबरोबरच आणखी एक अतिरिक्त जलाशय बांधावे, अशीही मागणी त्यांनी केली.

धरणात पाणी असूनही मुंबईच्या अनेक भागात पाणी टंचाई का आहे, असा सवाल आमदार नर यांनी उपस्थित केला आहे. पालिका प्रशासनाने अघोषित पाणी कपात लागू केली आहे. एखाद्या ठिकाणची तक्रार केली की तिथला पाणीपुरवठा सुरळीत होतो व दुसरीकडे पाणी टंचाई निर्माण होते. जल अभियंता विभागातील अधिकारी लक्ष देत नाहीत. त्यामुळे आयुक्तांपर्यंत जावे लागते. पश्चिम उपनगरातील लोकसंख्या वाढत असून पाणी कमी पडू लागले आहे.